**कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**स्थायी समिती सभा क्र.१७ सन २०२३/२४**
**स्थायी समिती सभा मंगळवार, दिनांक २०/०६/२०२३**

## कार्यवृत्तांत

कोल्हापूर जिल्हा परिषदेची तहकूब स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक २०.०६.२०२३ इ.रोजी दुपारी १२.३० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साो,जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे दालनात प्रत्यक्षात आयोजीत केली होती. सदर सभेचा कार्यवृतांत खालील प्रमाणे आहे.

येणेप्रमाणे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक, तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी सभेस उपस्थित झाले व सभा कामकाजास सुरवात झाली.

**सचिव :-** सर्वांना नमस्कार. कोल्हापूर जिल्हा परिषदेची प्रशासक कालावधीतील सभा आज मंगळवार दिनांक २०.०६.२०२३ इ.रोजी आयोजित केली आहे. आजच्या सभेसाठी उपस्थित असलेले जिल्हा परिषदेचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक साो, मा.अति मुख्य कार्यकारी अधिकारी सो, मा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. कोल्हापूर तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करते. व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक,यांच्या मान्यतेने सभा कामकाजास सुरवात करते.

**विषय क्र.१ :-** स्थायी समिती सभा दिनांक १६/०५/२०२३ इ रोजी दुपारी १२.३० वाजता संपन्न झाली त्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे. **(सा.प्र)**

**सचिव-** सर्व खातेप्रमुखाना मागील आठवडयातच सदर सभेचा कार्यवृतांत पाठविणेत आलेला आहे. याबाबत कोणत्या विभागाची काही अडचण आहे का ?

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** कोणत्याही विभागाची सदर कार्यवृतांता बाबत काही आक्षेप नाही असे समजून कार्यवृतांत कायम करणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २०८** **दिनांक २०-०६-२०२३**

स्थायी समिती सभा दिनांक १६/०५/२०२३ इ रोजी दुपारी १२.३० वाजता संपन्न झाली होती. सदर स्थायी समिती सभेच्या इतिवृतांचे सभागृहात वाचन करणेत येवून सर्वानुमते इतिवृत्त कायम करणेबाबतचा ठराव पारीत करणेत आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२ :-** सप्ताहामध्ये प्राप्त झालेल्या महत्वाचे शासन निर्णय परिपत्रके वाचन करणे.

**सचिव -** १.कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.झेडपीए-२०२३/प्र.क्र.५०/ पं.रा.-१ दि.१५/०५/२०२३ रोजीचे दिनांक २१ जून २०२३ हा दिवस ९ वा जागतिक योगा दिन साजरा करण्याबाबतच्या सूचनांचे वाचन करण्यात आले.

२.ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक :झेडपीए २०२२/प्र.क्र.११२/पंरा-१ दिनांक १२ जून २०२३ अन्वये यशवंत पंचायत राज अभियान सन २०२२-२३ राज्यातील अत्युत्कृष्ट जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांना विभाग व राज्यस्तरावर पुरस्कार करीता निवड केली आहे. यामध्ये जिल्हा परिषद, कोल्हापूर ला राज्यस्तरावर व्दितीय पारितोषिक व विभाग स्तरावर पंचातय समिती गडहिंग्लज ला व्दितीय पुरस्कार देण्यात आला आहे.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम) -** ग्राम विकास विभाग शासन आदेश क्रमांक : निविदा-२०२१/प्र.क्र.१३/बांध-४ दिनांक १८ मे २०२३ नुसार ई-निविदा प्रणाली अंतर्गत अल्प कालावधीची निविदा सूचना प्रसिध्द करण्याबाबतच्या सूचनांचे वाचन करण्यात आले.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) -** ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक : आंजिब-२०२३/प्र.क्र.११७/आस्था-१४ दिनांक २३ मे २०२३ अन्वये जिल्हा परिषदेच्या शिक्षक संवर्गाच्या आंतरजिल्हा बदल्यांसाठी सुधारित धोरण निश्चित केलेल्या सूचनांचे वाचन करण्यात आले.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) -** ग्राम विकास विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक : व्हीपीएम-२०२३/प्र.क्र.४४/पंरा-३ दिनांक ३१ मे २०२३ अन्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्ताने राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये महिला विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्याबाबत सूचनांचे वाचन करण्यात आले.

**विषय क्र.३ :-** माहे मे २०२३ ची जमा व खर्चाची प्रपत्र मंजूरीबाबत. **(वित्त)**

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी -** माहे मे २०२३ च्या जमा व खर्चाच्या प्रपत्रांना मंजूरी बाबतचा विषय आहे. माहे मे २०२३ अखेर हस्तांतरण जमा तपशील रक्कम रु.९३७८११९०९/-असून खर्च रक्कम रुपये ८४३०१२९१५/- इतका आहे. अभिकरण योजना जमा रक्कम रु.५०७४५८०/- असून खर्च रक्कम रुपये २८९९८२७/- आहे. तसेच जि.प स्वनिधि जमा रक्कम रु.२०९०५१८/- इतकी असून खर्च रक्कम रु.४८६९३२/- इतका आहे. तरी सदर विषयास मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** मंजूरी देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २०९** **दिनांक २०-०६-२०२३**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे मे २०२३ ची जमा व खर्चाची पत्रके अवलोकन करणेत आली. वित्त समितीने ठराव क्र.०७ दिनांक ०१.०६.२०२३ ने केलेल्या शिफारशीनुसार त्यास मंजूरी देण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.४ :-** स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेअंतर्गत कायमस्वरूपी अपूर्ण तालुका विक्री केंद्र इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत **(डीआरडीए)**

**मा.प्रकल्प संचालक -** स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेअंतर्गत कायमस्वरूपी अपूर्ण तालुका विक्री केंद्र इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत विषयास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २१०** **दिनांक २०-०६-२०२३**

कोल्हापूर जिल्हयातील अपूर्ण असलेल्या तालुका विक्री केंद्राच्या इमारती पूर्ण करणेसाठी कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी इमारतीचे अपूर्ण असलेल्या बाबींचे सुधारीत अंदाजपत्रक सन २०२२-२३ चे मंजूर दरसूचीनुसार या कार्यालयास सादर केलेले आहे.

या इमारतींची अपूर्ण कामे पूर्ण करुन तालुकास्तरीय विक्री केंद्रामध्ये स्वयंसहाय्यता समुह (बचत गट) उत्पादीत केलेल्या मालाची विक्री कायमस्वरुपी करु शकतील व सदयस्थितीमध्ये बंद असलेल्या इमारती वापरात येतील. या करीता अनुषंगिक बाबींचे एकूण रक्कम रु.१,८८,१०,०१८/- इतकी आवश्यक आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुका विक्री केंद्राचे नाव | अंदाजित र.रु. (DSR २०२२-२०२३) | अंदाजपत्रकातील अत्यावश्यक बाबी अंदाजीत र.रु. |
|---|---|---|---|
| १ | हातकणंगले | ४६२६६६५ | ८५३६७९ |
| २ | चंदगड | २९९९९९८ | १३३७३८४ |
| ३ | गगनबावडा | ५३९८८०९ | ३०४७७५५ |
| ४ | पन्हाळा | २९९९९०३ | १२८१७७८ |
| ५ | गडहिंग्लज | २७८४६४३ | ५७३४६९ |
| | एकूण | १८८१००१८ | ७०९४०६४ |

शासनाने दि.१०/०८/२०१९ चे पत्रान्वये मागणी केलेप्रमाणे शिल्लक अखर्चित निधी व्याजासह शासनखाती दि.२६/०९/२०१९ रोजी जमा करणेत आलेला आहे. त्यामुळे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कोल्हापूर कडील तालुका विक्री केंद्र खात्यावर रक्कम शिल्लक नाही.

उपरोक्त तालुका विक्री केंद्र इमारतीची अपूर्ण कामे पूर्ण करणेसाठी जिल्हा परिषदेकडील निधी उपलब्ध झालेस तालुका विक्री केंद्र इमारतींची अपूर्ण कामे पूर्ण करुन घेणेत येवून स्वयंसहाय्यता समुहांनाी (बचत गट) उत्पादीत केलेल्या मालाची विक्री करणेस उपलब्ध करुन देता येतील.

तरी प्रस्तावित अंदाजपत्रकीय र.रु.१,८८,१०,०१८/- त्यापैकी इमारती वापरात आणणेसाठी अत्यावश्यक निधी र.रु.७०.४९ लाख रक्कमेस ग्रामविकास विभागाकडील दि.०६/०९/२०२१ व ०८/१०/२०२१ चे शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेकडील इमारत देखभाल दुरुस्ती निधीमधून खर्च करणेस प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.५ :-** जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२३-२४ कामधेनू दत्तक ग्राम योजनेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत **(पशुसंवर्धन)**

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी -** कामधेनू दत्तक ग्राम योजनेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक -२११** **दिनांक २०-०६-२०२३**

जिल्हा वार्षिक सर्व साधारण योजनेंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात कामधेनू दत्तक ग्राम ही योजना राबविणेत येत आहे. जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजने अंतर्गत जिल्हा नियोजन समिती कोल्हापूर मार्फत कामधेनू दत्तक ग्राम योजनेवर र.रु.८३.०० लक्ष नियतव्यय उपलब्ध असून त्यामधून उपलब्ध निधीच्या अधिन राहून जिल्हयातील ५४ गावात ही योजना राबविणेची आहे. जिल्हा नियोजन कार्यालयाने पूर्ण रक्कमेस प्रशासकिय मान्यता घेण्याबाबत सूचीत केले आहे. शासन निर्णय क्र.नापुयो २०१०/प्र.क्र.५०/पदुम ४/मंत्रालय मुंबई ३२ दि.२९ ऑक्टोंबर २०१० अन्वये योजनेच्या सविस्तर मार्गदर्शन सूचना तसेच खात्याचे पत्र क्रं आयुक्त पशुसंवर्धन म.रा.पुणे १ यांचे पत्र तसेच शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.तापुयो २०१०/प्र.क्रं.५०/पदुम ४ मंत्रालय मुंबई ३२ शिबीर कार्यालय नागपूर दि.१६/१२/२०११ नुसार राबविणेत येत असून या योजनेच्या एकूण १० बाबींवर या योजनेचे नियोजन करणेत येत आहे.

सदर योजनेसाठी जिल्हा वार्षिक सर्व साधारण योजना सन २०२३-२०२४ मध्ये या योजनेवर ८३.०० लाख तरतूद उपलब्ध करुन देणेत आली आहे. सदर योजना राबविण्यास पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती

सभा दि.०२/०५/२०२३ ठराव क्र.२ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. सदर तरतूदीस वित्तीय व प्रशासकिय मान्यता देणेचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. र.रु.८३.०० लक्ष निधी मधून ५४ गावामध्ये प्रती गाव रु.१,५२,५००/- या मर्यादेत खर्ची पडणार आहे. योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार खालील १० बाबींवर तरतूद खर्ची पडणार असून त्याचे वितरण खालील प्रमाणे.

१. पशुपालक मंडळ स्थापन करणे व सहलीचे आयोजन करणे
   ५४ गावे X ७०००/- = रु.३,७८,०००/-
२. जंतनाशक शिबीरे -
   ५४ गावे X १७५००/- = रु.९,४५,०००/-
३. खनिजद्रव्ये जिवनसत्वे पुरवठा -
   ५४ गावे X ४०,०००/- = रु.२१,६०,०००/-
४. गोचिड गोमाशि निमुर्लन -
   ५४ गावे X १३०००/- = रु.७,०२,०००/-
५. वंधत्व निवारण शिबीरे व औषधउपचार शिबीरे -
   ५४ गावे X २२०००/- = रु.११,८८,०००/-
६. वैरण विकास कार्यक्रम -
   ५४ गावे X १७०००/- = रु.९,१८,०००/-
७. निकृष्ठ चारा सकस करणे -
   ५४ गावे X ५०००/- = रु.२,७०,०००/-
८. प्रसिध्दी व प्रचार -
   ५४ गावे X २१,०००/- = रु.११,३४,०००/-
९. नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे -
   ५४ गावे X ५०००/- = रु.२,७०,०००/-
१०. जनावरांचे मलमुत्र व्यवस्थापन व वाया गेलेल्या चा-याचे खत व्यवस्थापन
   ५४ गावे X ५०००/- = रु.२,७०,०००/-

असे एकूण रु.८२,३५,०००/- तरतूद खर्ची पडणार असून वरील पैकी जंत नाशके, खनितद्रव्ये, गोचिड गोमशि निमुर्लन औषधे व वंधत्व व औषधोपचारासाठी औषधे खरेदी, वैरणासाठी बि बियाणे व वैरणीची ठोंबे व प्रसिध्दी व प्रचाराचे साहित्य या बाबी खरेदीची प्रक्रिया खात्याचा भावबंद दर करार नुसार अथवा शासकिय विहीत पध्दतीचा अवलंब करुन मुख्यालया मार्फत करणेत येणार आहे व उर्वरीत उपक्रम राबविणेसाठी तरतूद ही पंचायत समिती स्तरावर वित्त प्रेशनाने आदा करणेत येणार आहे.

कामधेनू योजनेचा थोडक्यात सारांश

| | |
|---|---|
| १. पशुपालक मंडळ स्थापना करणे व सहलीचे आयोजना करणे | - रु.७०००/- प्रति गाव |
| २. जंतनाशक शिबीरे | - रु.१७५००/- प्रति गाव |
| ३. खनिजद्रव्ये जिवनसत्वे पुरवठा | - रु.४००००/- प्रति गाव |
| ४. गोचिड गोमाशि निर्मुलन | - रु.१३०००/- प्रति गाव |
| ५. वंधत्व निवारण शिबीरे व औषध उपचार शिबीरे | - रु.२२०००/- प्रति गाव |
| ६. वैरण विकास कार्यक्रम | - रु.१७०००/- प्रति गाव |
| ७. निकृष्ठ चारा सकस करणे | - रु.५०००/- प्रति गाव |
| ८. प्रसिध्दी व प्रचार | - रु.२१०००/- प्रति गाव |

९. नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणे - रु.५०००/- प्रति गाव
१०. जनावरांचे मलमूत्र व्यवस्थापन व खत व्यवस्थापन - रु.५०००/- प्रति गाव
एकूण - रु.१५२०००/- प्रति गाव

वरील पैकी क्र.२,३,४ व ५ या बाबींवरील एकूण रु.४९,९५,०००/- खर्च होणार असून बाब क्र.६ बियाणे खरेदी वर र.रु.९,१८,०००/- खर्च होणार आहे. अशी एकूण र.रु.५९,१३,०००/- इतकी रक्कम मुख्यालयात खर्च पडणार असून उर्वरीत र.रु.२३,२२,०००/- इतकी रक्कम बाब क्र.१,७,८,९,१० या बाबींवर गरजेनुसार जिल्हास्तर व तालुकास्तरावर खर्च पडणार आहे. या योजनेवरील तरतूद र.रु.८३.०० लाखा पैकी रु.५९,१३,०००/- लाखाची औषधे व वैरण बियाणे ही भावबंद करारानुसार अथवा विहीत शासकिय पध्दतीचा अवलंब करुन खरेदीस मान्यता तसेच र.रु.८३.०० लाख च्या खर्चास तसेच प्रशासकिय व वित्तय मंजूरीचे अधिकार मा.जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस आहेत. सदरच्या विषयास स्थायी समिती जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.६** :- एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम सन २०२३-२०२४ एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रमांतर्गत ५० टक्के अनुदानावर एक दिवशीय कुक्कुट पिले गट वाटप योजनेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. **(पशुसंवर्धन)**

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी -** एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम सन २०२३-२०२४ एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रमांतर्गत ५० टक्के अनुदानावर एक दिवशीय कुक्कुट पिले गट वाटप योजनेस प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक -२१२** **दिनांक २०-०६-२०२३**

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रमांतर्गत ५० टक्के अनुदानावर एक दिवशीय कुक्कुट पिले गट वाटप ही योजना राबविण्यात येत असून या योजनेवर र.रु४०.०० लाख नियतव्यय मंजूर आहे.

शासन निर्णय क्र.जिवायो-२०१०/प्रक्र३१२/पदुम-४ दि.१६/०९/२०१० व कुक्कुट २०२२/प्रक्र२८/पदुम -४ दिनांक २० जानेवारी २०२३ नुसार सदर योजना राबविण्यात येत असून त्यामधील मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थी निवडावयाचे आहेत. उपलब्ध तरतूदीमधून जिल्हयातील २७१ लाभार्थींना लाभ देता येणार आहे. वरील योजना ही सर्व गटातील प्रवर्गासाठी असून ५० टक्के अनुदानावर प्रति लाभार्थी सुधारीत जातीच्या १०० मिश्र कुक्कुट पिलांना गट वाटप करण्यात येणार आहे. सदर योजना ही र.रु.२९५००/- ची असून त्यापैकी रु.१४,७५०/- अनुदानाची रक्कम असून उर्वरीत र.रु.१४७५०/- लाभार्थीने स्वहिस्सा उभारावयाचा असून त्यामधून लाभार्थीने १०० पिलांसाठी लागणारा रात्रीचा निवारा,वाहतुकीवरील खर्च, खादयावरील खर्च, औषधी, पाण्याची व खादयाची भांडी इत्यादीवरील खर्च भागविण्याचा आहे. या योजनेच्या सुधारीत शासन निर्णय शुध्दीपत्रक जिवायो/२०१०/प्रक्र/३१२/पदुम-४/मंत्रालय मुंबई ३२ दि.३०/०४/२०१४ मधील मुद्दा क्र.११ नुसार एक दिवशीय पिले गटाची सर्व रक्कम म्हणजे रु.२५००/- प्रति लाभार्थी याप्रमाणे होणारी रक्कम या कार्यालयामार्फत मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र यांचेकडे धनादेशाव्दारे जमा करण्यात येणार आहे. निवडलेल्या लाभार्थ्याचे नावे बँक खात्यावर पशुखाद्याच्या र. रु.१२२५०/- अनुदानापैकी पहिल्या टप्प्यात रु.६१२५/- जमा

करणेत येईल. लाभार्थ्याने खाद्य खरेदी केल्याची खात्री झाल्यानंतर उर्वरीत र. रु.६१२५/- दुसऱ्या टप्प्यामध्ये लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहेत.

सदर योजना राबविण्यास पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभा दि. २/५/२०२३ ठराव क्र. २ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. वरील योजनेवरील तरतुद रु. ४०.०० लक्ष च्या प्रशासकिय मान्यतेचे अधिकार शासन निर्णय क्र. झेडपीए/२०१६/प्रक्र/५६/वित्त-९ मंत्रालय मुंबई ३२ दि. ०७/१०/२०१७ अन्वये मा. स्थायी समितीस असल्याने वरील योजना राबविण्यासाठी प्रशासकिय मान्यता देण्याचा ठराव पारीत करण्यात आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.७ :-** जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२३-२०२४ दुभत्या जनावरांना खादय उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रम (वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम) **(पशुसंवर्धन)**

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी -** जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२३-२०२४ दुभत्या जनावरांना खादय उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रम (वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम) या विषयास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २१३** **दिनांक २०-०६-२०२३**

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत जिल्हा परिषंदाना वैरण व पशुखाद्य विकासासाठी अनुदान या योजनेवर र.रु.६०.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. सदर तरतुदीमधून उपलब्ध निधीच्या अधिन राहुन खर्च करण्यात येणार आहे.

सदर तरतुदीमधुन जिल्हयातील शेतकऱ्यांना र. रु. १५०० च्या मर्यादेत १०० टक्के अनुदानावर खरीप व रब्बी हंगामा करीता वैरण बियाणे पुरविणेत येणार आहेत. लाभार्थी निवड ही तालुकानिहाय जनगणनेच्या आधारावर होणार आहे. जिल्हयातील संभाव्य पूरपरिस्थीतीमुळे चाराटंचाई अथवा टंचाईसदृष्य परिस्थिती निर्माण झाल्यास पशुधनास सकस हिरवी वैरण उपलब्ध होण्याच्या दृष्टिने वैरणीच्या बियाण्यांची खरेदी करणे गरजेचे आहे. सदरची बियाणे खरेदी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ अकोला / राष्ट्रीय बीज निगम लि. पुणे यांचेकडील भावबंद करार अथवा विहित शासकिय कार्यप्रणाली व्दारे करणेचे प्रस्तावित आहे. सदर योजनेवरील तरतुद र रु. ६०.०० लाख खर्च करणेस व योजना राबविणेस पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभा दि. २/५/२०२३ ठराव क्र. २ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे.

वरील योजनेवरील तरतुद र रु.६०.०० लाख खर्चास प्रशासकिय मंजुरी देणेचे अधिकार शासन निर्णय क्रं झेडपीए/ २०१६/ प्र क्र ५६/ वित्त -९ मंत्रालय मुंबई ३२ दि ०७/१०/२०१७ अनव्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासहिंता १९६८ (नियम ४) नुसार मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण असल्याने सदरच्या विषयास स्थायी समितीची मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.८ :-** जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२३-२०२४ विविध पशु वैद्यकीय संस्थाना औषध पुरवठा करणे. या योजनेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. **(पशुसंवर्धन)**

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी -** जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२३-२०२४ विविध पशु वैद्यकीय संस्थाना औषध पुरवठा करणे. या योजनेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २१४** **दिनांक २०-०६-२०२३**

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर यांचेकडील जा. क्र. नियो/कार्या १८/नावियो/२०२३/१०६३ दि. २१/०४/२०२३ अन्वये जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेअंतर्गत विविध पशुवैदयकिय दवाखान्यांना औषध पुरवठा करणे या योजनेवर र.रु.१२४.६० लक्ष नियतव्यय उपलब्ध आहे. सदर तरतुदीमधून उपलब्ध निधीच्या अधिन राहुन जिल्हयातील सर्व पशुवैदयकिय संस्थांना दैनंदिन वापराची व अत्यावश्यक जीवरक्षक औषधे पुरवठा करावयाची असून सदर औषधे हि खात्याचा भावबंद करारानुसार/विहित शासकिय कार्यप्रणालीनुसार खरेदी करावयाची आहेत. सदर योजना राबविण्यास पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभा दि.२/५/२०२३ ठराव क्र. २ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे.

या योजनेवरील तरतुद र.रु.१२४.६० लाखाची औषधे ही खात्याच्या भावबंद करारानुसार/विहित शासकिय कार्यप्रणालीनुसार औषध खरेदीस प्रशासकिय व वित्तीय मंजूरीचे अधिकार शासन निर्णय क्र. झेडपीए/२०१६/प्र.क्र.५६/ वित्त-९/मंत्रालय मुंबई नं.३२ दि.०७/१०/२०१७ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद पं. स. लेखा सहीता १९६८ (नियम ४) नुसार मा. जिल्हा परिषद सर्व साधारण सभेस आहेत. सदरच्या विषयास स्थायी समितीची मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.९ :-** विशेष घटक योजना २०२३-२०२४ अनुसुचित जातीच्या लाभ धारकांकडील जनावरे, शेळया, मेंढया, कोंबडयांना जंतनाशक पाजणे, क्षारऔषधे पुरविणे व परजीवी किटकांचे नियंत्रण करण्यासाठी उपाययोजना करणे योजनेअंतर्गत औषध खरेदीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत **(पशुसंवर्धन)**

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी -**अनुसुचित जातीच्या लाभ धारकांकडील जनावरे, शेळया, मेंढया, कोंबडयांना जंतनाशक पाजणे, क्षारऔषधे पुरविणे व परजीवी किटकांचे नियंत्रण करण्यासाठी उपाययोजना करणे योजनेअंतर्गत औषध खरेदीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २१५** **दिनांक २०-०६-२०२३**

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात अनुसुचित जाती उपयोजनेअंतर्गत अनुसुचित जातीच्या लाभाधारकाकडील जनावरे, शेळया मेंढया व कोंबडयांना जंतनाशके, गोचिड गोमाशी निर्मुलन व क्षारऔषधे पुरवठा करणेत येणार असून या योजनेवर र. रु ८०.०० लाख नियतव्यय मंजूर असुन समाजकल्याण विभागाने पूर्ण रक्कमेस प्रशासयकिय व वित्तीय मान्यता घेण्यास सुचित केले आहे. सदर तरतुदीमधून जिल्हयातील सर्व पशुवैद्यकिय दवाखान्यांमार्फत अनु. जातीच्या लाभधारकांकडील पशुधनास जंतनाशके, गोचिडगोमाशी निर्मुलन औषधे क्षारऔषधे इ. पुरवठा करणेत येणार आहे. योजनेअंतर्गत खरेदी करावयाची औषधे भावबंद करारानुसार व विहित शासकिय पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करावयाची आहेत तसेच सदर योजनेवरील खर्च हा उपलब्ध निधीच्या अधिन राहुन करण्यात येणार आहे.

सदर योजना राबविण्यास पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभा दि. २/५/२०२३ ठराव क्र. ३ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. शासन निर्णय क्रं झेडपीए-२०१६/ प्र क्रं ५६/वित्त-९ मंत्रालय मुबई ३२ दि. ०७/१०/२०१७ अन्वये रु.८०.०० लाखास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार मा.जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे सदरच्या विषयास स्थायी समिती सभेची मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१० :-** अनुसुचित जाती उपयोजनाना १०+१ शेळी गट पुरवठा या प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत **(पशुसंवर्धन)**

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी -** अनुसुचित जाती उपयोजनाना १०+१ शेळी गट पुरवठा या प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २१६** **दिनांक २०-०६-२०२३**

अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) सन २०२३-२०२४ साठी अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) अंतर्गत अनु.जाती /नवबौध्द लाभार्थी १०+१ शेळी गट पुरवठा या योजनेवर र.रु.२५०.०० लक्ष नियतव्यय मंजूर करणेत मंजूर असुन समाजकल्याण विभागाने पूर्ण रक्कमेस प्रशासयकिय व वित्तीय मान्यता घेण्यास सुचित केले आहे. या योजनेअंतर्गत प्रति लाभार्थी र.रु. ७७,६५९/- च्या मर्यादेत ७५ टक्के अनुदानावर १०+१ शेळी गट पुरवठा करणेत येणार आहे. सदरची योजना कृषी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभागाकडील शासन निर्णय क्र पविआ-१०२०/प्रक्र ११०/पदुम-३ दि. २५ मे २०२१ मधील मार्गदर्शक सुचना नुसार जिल्हयामध्ये राबविणेत येणार आहे. सन २०२२-२३ मध्ये मंजुर नियतव्यय रु.२५०.०० लक्ष मधुन जिल्हयातील ३२१ लाभार्थीना तालुका निहाय अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या आधारावर त्याप्रमाणात विभागुन तालुकानिहाय लंक्षाकानुसार लाभ देणेत येणार आहे. तसेच सदर योजनेवरील खर्च हा उपलब्ध तरतुदीच्या अधिन राहुन करण्यात येणार आहे.

सदर योजना राबविण्यास पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभा दि. २/५/२०२३ ठराव क्र.३ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. १०+१ शेळी गट पुरवठा करणे या योजनेवरील तरतुद रु. २५०.०० लक्ष तरतुदीस शासन निर्णय क्र झेडपीए-२०१६/प्रक्र ५६/वित्त ९ मंत्रालय मुंबई ३२ दि.०७/१०/२०१७ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे असल्याने सदरच्या विषयास स्थायी समिती सभेची मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.११ :-** विविध विकास कामाचे महसुलात जमा असणारी कामाची अनामत रक्कमा परत करणे बाबत **(बांधकाम)**

**कार्यकारी अभियंता (बांधकाम) :-** विविध विकास कामंच्या महसुलात जमा असाणारी कामाची अनामत रक्कत परत करणे बाबत विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** किती रक्कम आहे.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-**तेरा कामांच्या रक्कमा अंदाजे ८००० ते ५,७५,०००/- पर्यंत रक्कम आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** कागद पत्रांची पूर्तता पाहून वरील प्रकरणात रक्कम परत करण्याची योग्य ती कार्यवाही करणेत यावी.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम) :-** हो सर.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २१७** **दिनांक २०-०६-२०२३**

खाली नमूद कामांची व्यपगत अनामत रक्कम मक्तेदार यांनी मागणी केली असून त्या संबंधीची तसेच प्रस्तुत रक्कम महसुल खाती जमा केली असेलबाबत खातरजमा केली आहे.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कामाचे नाव | ठेकेदार | अनामत रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | एम आर हायस्कुल गडहिंग्लज या माध्यमिक शाळेची इमारत बांधकाम / वि दु करणे | श्री संतोष शशिकांत चोथे | १४९६१/- | |
| २. | मौ.बावेली पैकी काटेवाडी ता गगनबावडा येथे अंगणवाडी क्र.२७ इमारत बांधणे | श्री कासीम उस्मान पाटणकर | २९९९३/- | |
| ३. | मौ.औरनाळ ता गडहिंग्लज अंगणवाडी क्र १९७ इमारत बांधणे | श्री संजय महादेव कुंभार | १८०००/- | |
| ४. | शिरोळ तालुक्यातील जुगुळ राज्य हददीपासुन आलास,बुबनाळ,औरवाड रस्ता इजिमा ४६ किमी ५/९०० ते ७/८०० सुधारणा करणे. | श्री.सुरेश रायगोंडा बिरांजे | २८,५६३/- | |
| ५. | मौ.राधानगरी तालुक्यातील प्रजिमा ४५ ते पनोरी लिंगाचीवाडी काळम्मावाडी पाटपन्हाळा रामणवाडी फेजिवडे रा.मा.१७८ ला मिळणारा रस्ता इजिमा क्र.६६ किमी ०/०० ते २०/०० सुधारणा करणे. | श्री संजय शामराव निकाडे | ५,७४,४७३/- | |
| ६. | मौ.कोल्हापुर जिल्हातील प्रजिमा ४१ पासुन पडसाळी चव्हाणवाडी कोकणीचाधनगरवाडा ते तांबोळीचा धनगरवाडा ते प्रजिमा ६५ ला मिळणारा रस्ता सुधारणा करणे व मोरी बांधणे. | श्री.मोहन शंकर पाटील | २,८४,१८८/- | |
| ७. | मौ.आलास ता शिरोळ येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | श्री.अमोल महावीर बिरनाळे | २५,०००/- | |
| ८. | मौ.आळते ता.हातकणंगले येथील दलित वस्तीमध्ये पदपथ करणे. | श्री.सुहास दिनकर शिर्के | ३५,०००/- | |
| ९. | मौ.गुडाळ ता.राधानगरी येथील अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | श्री.अजिंक्य पांडुरंग हुजरे | ४९,९९८/- | |
| १०. | मौ.बावेली पैकी काटेवाडी ता.गगनबावडा येथे अंगणवाडी क्र.२७ इमारत बांधणे. | श्री.कासीम उस्मान पाटणकर | २९,९९३/- | |
| ११. | मौ.सावे ता.शाहुवाडी येथे ग्रामपंचायत इमारत बांधणे. | श्री आकाश ज्ञानदेव पाटील | ३०,०००/- | |
| १२. | मौ.अकिवाट ता.शिरोळ येथे स्मशानभुमी निवारा शेड बांधणे.(लिंगायत स्मशानभुमी) | श्री.अनिल तवनगोंडा पाटील | ८,९७२/- | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | मौ.औरनाळ ता.गडहिंग्लज येथे स्मशानशेड जाणारा रस्ता करणे. | श्री. संजय महादेव कुंभार | ८,९९९/- | |

वरील कामांची रक्कम ही तीन वर्षाखालील हक्क न सांगितलेल्या प्रलंबित ठेवी या सदराखाली राहिल्याने महाराष्ट्र जि.प.व पं.स. लेखासंहिता १९६८ मधील नियम २०९ (७) तीन नुसार व्यपगत ठेवी म्हणून जिल्हा परिषद जमा खाती घेतली आहे.वरील मक्तेदार यांचा या रक्कमेवर हक्क असनु महा.जि.प.व पं.स.लेखासंहिता नियम १९६८ मधील नियम २०९ (८) नुसार स्थायी समितीच्या पुर्व मान्यतेने त्यांना रक्कम अदा करता येते. सदरचा प्रस्ताव अवलोकनी येऊन सर्व कामांचे कामपूर्णत्वाचे दाखले असलेची व कामाविषयी तक्रार नसलेची खात्री करुन संबंधीत मक्तेदारांना अनामत रक्कम आदा करणेस स्थायी समितीची मंजूरी देणेत येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१२ :-** समाजकल्याण विभागाकडील जिल्हा परिषद सेस फंडातील ५% दिव्यांग निधी अंतर्गत योजनानिहाय प्राप्त तरतूदीचे पुर्नविनियोजन करुन सन २०२३-२४ च्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करणेस मान्यता मिळणेबाबत. **(समाजकल्याण)**

**जिल्हा समाजकल्याण अधिकारी :-** जिल्हा परिषद सेस फंडातील ५% दिव्यांग निधी अंतर्गत योजनानिहाय प्राप्त तरतूदीचे पुर्नविनियोजन करुन सन २०२३-२४ च्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करणेस सदर विषयास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २१८** **दिनांक २०-०६-२०२३**

जिल्हा परिषदेने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात समाजकल्याण विभागास दिव्यांगासाठी राखीव ५%सेसफंडातून रक्कम रुपये २,५६,१५,१००/- इतकी तरतूद मूळ अंदाजपत्रकाद्वारे करण्यात आली आहे. सदर तरतूदीमधून वैयक्तिक व सामुहिक लाभाच्या विविध योजना मंजूर केलेल्या आहेत. त्याकरीता खालीलप्रमाणे रकाना क्र.३ प्रमाणे मूळ तरतूद करण्यात आली होती तसेच सन २०२३-२४ मध्ये उपलब्ध तरतुदीची रक्कम समाजकल्याण समिती सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे रकाना क्रमांक ४ मध्ये दर्शविलेप्रमाणे पुर्नविनियोजन करून रकाना क्र.५मध्ये दर्शविलेप्रमाणे योजनानिहाय सुधारीत तरतुदीस जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेची आहे.

५% जि.प. सेस फंड अंतर्गत दिव्यांगासाठी राबवावयाच्या योजना

| अ.क्र. | अंदाजपत्रकीय बाब / लेखाशिर्ष | सन २०२३-२४ मधील मूळ तरतूद | पुर्नविनियोजित करावयाची रक्कम रुपये | | सन २०२३-२४ मध्ये पुर्नविनियोजनाव्दारे उपलब्ध होणारी सुधारीत तरतूद (रक्कम रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ |
| | | | कमी | अधिक | |
| १ | दिव्यांगासाठी उदयोजकता व कौशल्य विकास | १००० | ० | ० | १००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | प्रशिक्षण वर्गाचे आयोजन | | | | |
| २ | दिव्यांगासाठी रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करणे | १००० | ० | ० | १००० |
| ३ | दिव्यांगांचे दिव्यांगत्व घालवण्यासाठी शिबिर आयोजित करणे पुर्नवसन करणे, EPC केंद्रामध्ये विशेष तज्ञ घेणे या उपाययोजना कराव्यात | १०००००० | ० | ० | १०००००० |
| ४ | दिव्यांग शाळेतील विदयार्थ्यांना शैक्षणिक साधने व उपकरणे पुरविणे | १००० | ० | ० | १००० |
| ५ | जागतिक दिव्यांग दिना निमित्त दिव्यांग विदयार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा व हस्तकला वस्तुंचे प्रदर्शन आयोजित करणे | २५०००० | ० | ५०००० | ३००००० |
| ६ | दिव्यांग शाळांना शैक्षणिक साहित्य पुरविणे | १००० | ० | ४९९९००० | ५०००००० |
| ७ | हेलन केअर दिव्यांग प्रेरणा पुरस्कार | १००० | ० | ० | १००० |
| ८ | दिव्यांग मित्र अभियान जिल्हयातील दिव्यांग शोधणे, वैदयकिय कॅम्प लावणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे | १००० | ० | ० | १००० |
| ९ | सार्वजनिक इमारती ठिकाणी दिव्यांगांसाठी अडथळा विरहीत वातावरण निर्मिती करणे जुन्या इमारतींचे ॲक्सेस ऑडीट करुन जुन्या इमारती मध्ये सुविधा निर्माण करणे यामध्ये रॅम्प्स, रेलिंग, टॉयलेट | १००० | ० | ० | १००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | बाथरुम पाण्याची व्यवस्था, लिफटस, लोकेशन बोर्ड इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देणे | | | | |
| १० | दिव्यांगत्व प्रतिबंधात्मक पुर्नवसन व सोयी सुविधा बाबत प्रचार, प्रसिध्दी जनजागृती करणे | ७००००० | ० | ३००००० | १०००००० |
| ११ | दिव्यांग विदयार्थ्यांच्या सेहसंमेलनासाठी क्रीडा स्पर्धा व आयोजित करणे अनुषंगिक खर्च | २५०००० | ० | ५०००० | ३००००० |
| १२ | कार्यालयीन खर्च | १२००००० | ७००००० | ० | ५००००० |
| १३ | ४०% पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांगांना सानुग्रह अनुदान | १००० | ० | ० | १००० |
| १४ | दिव्यांग बचतगटांना ३०० अंडी देणा-या कोंबडयासह शेड व अनुषंगिक साहित्यासह व्यवसायाकरीता अनुदान / दिव्यांग स्वयं सहाय्यता बचत गटांना स्वयंरोजगारासाठी साहित्ये व उपकरणे पुरवणे | १००० | ० | ९९९९००० | १००००००० |
| १५ | दिव्यांग - दिव्यांग विवाह प्रोत्साहान योजना | २१०१००० | ० | ० | २१०१००० |
| १६ | डॉ.पंजाबराव देशमुख- दिव्यांग व्यक्तींना शेती उपयोगी साहित्य खरेदीसाठी अनुदान (ताडपत्री, इलेक्ट्रीक मोटार, डिझेल इंजीन पाईप) | १००० | ० | ० | १००० |
| १७ | राजर्षी छत्रपती शाहू | १००० | ० | ० | १००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | महाराज सशक्तीकरण अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना नवीन मोटार सायकल/स्कूटर ॲडाप्टरसह पुरविणे/जुन्या मोटार सायकल/स्कुटरला ॲडाप्टर पुरविणे | | | | |
| १८ | दिव्यांग व्यक्तींना नवीन तीन चाकी सायकल पुरविणे | १००० | ० | ० | १००० |
| १९ | दिव्यांग व्यक्तींना कॅन्सर, क्षयरोग, मेंदुचे विकार, हृदय शस्त्रक्रिया इ. दुर्धर आजाराच्या वैदयकिय उपचारासाठी अर्थसहाय्य देणे | १००० | ० | ० | १००० |
| २० | दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी व्हेंडींग स्टॉल, टपरी पुरविणे | ० | ० | ० | ० |
| २१ | दिव्यांग पालकांच्या पाल्यांना शिक्षणासाठी अर्थ सहाय्य देणे DBT | ० | ० | ० | ० |
| २२ | दिव्यांग कल्याण करीताचा अनुषेश वर्ग खाते क्र.०२३४११००२१००४७७ (ग्रामविकास विभागाकडील सुचनेनुसार) | ० | ० | ० | ० |
| २३ | दिव्यांग विदयार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे संगणक / लॅपटॉप पुरविणे | २०००१०० | ० | ० | २०००१०० |
| २४ | दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे (मिरची कांडप, घरघंटी दळपयंत्र, दुरध्वनी, कॉइन | १७४००००० | १५९९८००० | ० | १४०२००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | बॉक्स, झेरॉक्स मशिन, पापड मशीन, कडबाकुट्टी मशीन, २ शेळी गट पुरविणे) | | | | |
| २५ | राष्ट्रीय/आंतराराष्ट्रीय पातळीवर स्पर्धेसाठी निवड झालेल्या जिहयातील शहरी व ग्रामीण भागातील दिव्यांगांना खेळाडूंना अर्थ सहाय्य पुरविणे | ७००००० | ० | १३००००० | २०००००० |
| २६ | दिव्यांग व्यक्तींना सहाय्य साधने पुरविणे श्रवणयंत्र व्हिलचेअर, जयपूर फुट इ. | १००० | ० | ० | १००० |
| | एकूण - | २५६१५१०० | १६६९८००० | १६६९८००० | २५६१५१०० |

तसेच शासन निर्णय दिनांक २५ जून २०१८ नुसार दिव्यांगांकरीता राखीव ५% निधी मधून ज्या त्या आर्थिक वर्षात शिल्लक तरतूद जिल्हा स्तरावरील दिव्यांग कल्याण निधी खातेवर वर्ग करुन खर्च करणेबाबत सूचना आहेत. त्यास अनुसरुन सध्यस्थितीत दिव्यांग कल्याण निधी खात्यावर वर्ग करणेत आलेली एकूण शिल्लक र.रु.१,२८,१९,७७२/- इतकी आहे. सदर तरतूदीमधून प्रत्येकी ५०% याप्रमाणे वैयक्तीक व सामुहिक स्वरुपाच्या योजना राबविण्यास समाजकल्याण समिती सभेमध्ये मान्यता देण्यात आली आहे. तसेच सन २०२३-२४ मध्ये दि.१९/०६/२०२३ अखेर शिल्लक निधी र.रु.१,२८,१९,७७२/- इतकी आहे. सदरची रक्कम दिव्यांग कल्याण निधी खातेवर वर्ग करुन खालीलप्रमाणे योजना राबविणेची आहे.

**जिल्हा दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत प्रस्तावित योजना**

| अ. क्र. | योजना | तरतूद रक्कम रु. (१,२८,१९,७७२/-) |
|---|---|---|
| | अ) सामुहिक स्वरुपाच्या योजना | |
| १ | दिव्यांग शाळांना शैक्षणिक साहित्य पुरविणे (सन २०२२-२३ चे दायित्व) | १५,००,०००/- |
| २ | दिव्यांग स्वयंसहाय्यता बचत गटांना अनुदान देणे (सन २०२२-२३ चे दायित्व) | ४७,०९,८८६/- |
| ३ | दिव्यांगांच्या सहाय्यकारी साधनांची दुरुस्ती करणेकरीता ५०% अनुदान | २,००,०००/- |
| | एकूण (अ) | ६४०९८८६/- |
| | ब) वैयक्तीक स्वरुपाच्या योजना | |
| १ | अस्थिव्यंग व्यक्तींना स्वयंचलित तीन चाकी सायकल पुरवणे | ६२,८४,८८६/- |
| २ | दिव्यांग खेळाडूंना प्रोत्साहनपर अर्थसहाय्य (सन २०२२-२३ चे दायित्व) | १,२५,०००/- |
| | एकूण (ब) | ६४०९८८६/- |
| | एकूण रक्कम रुपये | १,२८,१९,७७२/- |

सदरचा विषय स्थायी समिती सभेमार्फत येत्या जिल्हा सर्वसाधारण सभेमध्ये सादर करणेस समाजकल्याण समिती सभा दि. १२-०५-२०२३ ठराव क्रमांक ४४ नुसार शिफारस करण्यात आलेली आहे.त्यास अनुसरून सदरचा विषय जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये सादर करणेस स्थायी समिती मध्ये शिफारस करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१३ :-** समाजकल्याण विभागाकडील जिल्हा परिषद सेस फंडातील योजना २०२३-२४ मध्ये योजनानिहाय प्राप्त तरतुदीचे पुर्नविनियोजनास व सन २०२३-२४ च्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करणेस मान्यता मिळणेबाबत **(समाजकल्याण)**

**जिल्हा समाजकल्याण अधिकारी :-** जिल्हा परिषद सेस फंडातील योजना २०२३-२४ मध्ये योजनानिहाय प्राप्त तरतुदीचे पुर्नविनियोजनास व सन २०२३-२४ च्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करणेस शिफारस करणेस मान्यता मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २१९** **दिनांक २०-०६-२०२३**

जिल्हा परिषदेने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात समाजकल्याण विभागास मागासवर्गीयांसाठी राखीव २०% सेसफंडातून रक्कम रुपये ५,३९,६२,०००/- इतकी तरतूद मूळ अंदाजपत्रकाद्वारे करण्यात आली आहे. सदर तरतूदीमधून वैयक्तिक व सामुहिक लाभाच्या विविध योजना मंजूर केलेल्या आहेत. त्याकरीता खालीलप्रमाणे रकाना क्र.३ प्रमाणे मूळ तरतूद करण्यात आली होती. तथापि समाजकल्याण समिती सभेमध्ये सदर प्राप्त तरतूदीचे खालीलप्रमाणे रकाना क्रमांक ४ मध्ये दर्शविलेप्रमाणे पुर्नविनियोजन करून रकाना क्र.५ मध्ये दर्शविलेप्रमाणे योजनानिहाय सुधारीत तरतुदीस जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेची आहे.

अ -२० टक्के जि.प.स्वनिधीमधून मागासवर्गीय व्यक्तींसाठी योजना.

| अ.क्र. | अंदाजपत्रकीय बाब / लेखाशिर्ष | सन २०२३-२४ करीता मूळ तरतूद | सन २०२३-२४ करीता प्रथम सुधारीत तरतूद | | सन २०२३-२४ करीता पुर्नविनियोजना द्वारे उपलब्ध होणारी सुधारीत तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | कमी | अधिक | |
| १ | २ | ३ | ४ | | ५ |
| अ) मागासवर्गीय व्यक्तीसाठी योजना - | | | | | |
| १ | सावित्रीबाई मागासवर्गीय विधवा महिलांच्या विवाहास प्रोत्साहनपर अनुदान देणे | १००० | ० | ० | १००० |
| २ | मागासार्गीय वस्तीमध्ये बागबगिचे इ ठिकाणी वय प्राण्यापासून सुंरक्षणाकरीता सौर ऊर्जा झटका कुंपन करणे | १००० | ० | ० | १००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | सामाजिक न्याय दिन साजरा करणे | ० | ० | ० | ० |
| ४ | राजर्षि छत्रपती शाहू महाराज मागासवर्गीय विद्यार्थ्यं ाकरीता कमवा व शिका योजना | १५०००००० | ० | ० | १५०००००० |
| ५ | मागासवर्गीय बचतगटांना ३०० अंडी देणा-या कोंबडयासह शेड व अनुषंगिक साहित्यासह व्यवसायाकरीता अनुदान देणे. | ० | ० | ० | ० |
| ६ | समाजमंदिरामध्ये १० पर्यतच्या मुलांना शिक्षणासाठी शैक्षणिक सॉफटवेअर वापराकरीता एल ई डी टी व्ही पुरविणे | ० | ० | ० | ० |
| ७ | मागावर्गीय महिला बचत गटांना (ॲल्युमिनियम प्लाय पार्टिशंन, मिरची कांडप मशीन,घरघंटी दळपयंत्र,झेरॉक्स मशिन, शिलाई मशिन, पिकोफॉल मशीन, शेवया मशीन, पत्रावळी मशीन, पापड मशीन, रसवंती मशिन, आधुनिक यंत्र सामग्री पुरवणे) | १०००००००० | ५०००००० | ० | ५०००००० |
| ८ | मागासवर्गीय वस्तीतील शाळांकरीता आवश्यक साधन सामग्री पुरवणे | ० | ० | ० | ० |
| ९ | मागासवर्गीयांना शेती उपयोगी साहित्य खरेदीसाठी अनुदान पुरविणे (ताडपत्री ,इलेक्ट्रिक मोटर, डिजल इंजिन, एच.डी.पी.ई.पाईप कडबाकुटी मशिन ) | ३००१००० | ० | ० | ३००१००० |
| १० | रमाई वाचनालय - मागासवर्गीय वस्ती समाज मंदिरामध्ये वाचनालय तयार करणे पुस्तके पुरविणे | २०००००० | ० | ० | २०००००० |
| ११ | मागासवर्गीय वस्तीमध्ये रस्त्यावरील पोलसह LED/high mast बसविणे | २८५०००० | ० | १७१५०००० | २०००००००० |
| १२ | मागासवर्गीयांना बायोगॅस सयंत्रासाठी पूरक अर्थ सहाय्य(कृषि विभाग जि.प.को.यांनी निवड केलेले लाभार्थी व इंदिरा आवास योजना अनु्.जाती.लाभार्थी) | ० | ० | २०००००० | २०००००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | मागावर्गीयांना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे (मिरची कं ाडप मशीन, घरघंटी दळपयंत्र, झेरॉक्स मशिन, शिलाई मशिन, पिकोफॅाल मशीन,शेवया मशीन,पत्रावळी मशीन, पापड मशीन , रसवंती मशिना, इ पुरविणे, किमान २ शेळी गट पुरविणे ) | ७०००००० | ४५५०००० | ० | २४५०००० |
| १४ | मागासवर्गीय वस्ती समाज मंदिरामध्ये व्यायामाचे साहित्य पुरविणे/ग्रामीण भागात खुल्या व्यायमशाळेसाठी साहित्य पुरविणे | ६०००००० | ० | ० | ६०००००० |
| १५ | मागासवर्गीय अनुदानीत वस्तीगृहाना सोयी सुविधा पुरविणे - लोखंडी कॅाट, सोलर वॅाटर हिटर/इर्हटर, कॅाम्प्युटर, वॅाटर प्युरिफायर, सीसीटीव्ही, बिछाना साहित्य व टेलिव्हिजन संच दरिपंजा बेडशिट इत्यादी | १००० | ० | १५०००००० | २००१००० |
| १६ | कार्यालयीन खर्च | १०००००० | ० | ० | १०००००० |
| १७ | राजर्षि शाहू घरकुल योजना-घर दुरूस्ती | ० | ० | ० | ० |
| १८ | मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे संगणक / लॅपटॅाप/TAB पुरविणे | २००१००० | ० | ० | २००१००० |
| १९ | मागासवर्गीय इ.५वी ते १० च्या मुलांाना सायकल करिता अनुदान देणे | ५००००० | ० | ५००००० | १०००००० |
| २० | मागासवर्गीयांना समाज मंदिर सुधारणा व दुरस्तीस अर्थसहाय्य/ समाजमंदिराना सतरंजी पुरविणे | १००० | ० | ० | १००० |
| २१ | समाज मंदिरांना समाज उपयोगी भांडी पुरविणे | १००० | ० | ० | १००० |
| २२ | माणगाव ता.हात. येथील मागासवर्गीय वस्तीमध्ये उद्याने / बगीचे / समाज मंदिर प्रौढ शिक्षण व्यवस्था, क्रिडांगण ग्रंथालय इ. | ० | ० | ० | .० |
| २३ | राजर्षि शाहू घरकुल योजना - नविन घरकुल | ० | ० | ० | ० |
| २४ | मागासवर्गीयांना एल. ई. डी. बेस | ० | ० | ० | ० |
| | एकूण अ समाजकल्याण सर्वसाधारण | ३५८५७००० | ९५५०००० | २१६५०००० | ४८४५७००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ब) मागासवर्गीय महिलाकरीता योजना | | | | |
| १ | मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे (मिरची कांडप मशीन, घरघंटी दळप यंत्र, दुरध्वनी,कॉइन बाक्स, झेराक्स मशिन, शेवया मशिन, पत्रावळी मशिन ,पापड मशिन, कडबा कुट्टी मशिन, ओला मसाला मशिन, सुका मसाला मशिन इ. पुरविणे) | १७६००००० | १२६००००० | ० | ५०००००० |
| २ | इ.५वी ते १० च्या मागासवर्गीय मुलींना सायकल करिता अनुदान देणे | ५००००० | ० | ५००००० | १०००००० |
| ३ | मागासवर्गीय बचतगटांना/महिला मंडळांना सतरंजी पुरविणे करीता अनुदान देणे | १००० | ० | ० | १००० |
| ४ | इ.५वी ते १० च्या मागासवर्गीय मुलींना शाळेत जाण्यासाठी वाहतूक भत्ता देणे | १००० | ० | ० | १००० |
| ५ | १ ली ते १० वी वर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे करीता अनुदान देणे | १००० | ० | ० | १००० |
| ६ | मागासवर्गीय महिलांना LED बेस सौर ऊर्जा कंदिल, सोलर कुकर पुरविणे करीता अनुदान देणे | १००० | ० | ० | १००० |
| ७ | दारिद्रय रेषेवरील मागासवर्गीय महिला बचतगट स्वयंराजगारासाठी प्रशिक्षण देणे | १००० | ० | ० | १००० |
| | एकूण ब | १८१०५००० | १२६००००० | ५०००००० | १०५०५००० |
| | एकूण अ+ब | ५३९६२००० | १२१५०००० | २२१५०००० | ५३९६२००० |

सदरचा विषय स्थायी समिती सभेमार्फत येत्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये सादर करणेस समाजकल्याण समिती सभा दि.१२-०५-२३ मधील ठराव क्रमांक ४३ नुसार शिफारस करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन सदरचा विषय जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये सादर करणेस स्थायी समिती मध्ये शिफारस करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१४ :-** ग्रामपंचायत मौजे कंदलगाव ता.करवीर येथील आर.सी.सी. उंच पाण्याची टाकी निर्लेखनाबाबत **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** ग्रामपंचायत मौजे कंदलगाव ता.करवीर येथील आर.सी.सी. उंच पाण्याची टाकी निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शासकिय तंत्रनिकेतन, कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पू) जि.प.कोल्हापूर यांचेकडून शिफारस पत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २२०** **दिनांक २०-०६-२०२३**

ग्रामपंचायत कंदलगाव ता.करवीर येथील जुनी पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच/ ग्रामसेवक ग्रामपंचायत कंदलगाव यांचेकडून दि ११/०५/२०२३ रोजी पंचायत समिती, करवीर यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर पाण्याच्या टाकीचा नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत कंदलगाव ता. करवीर यांनी मासिक सभा ठराव क्रं ६५ दि. २२/०८/२०२२ व ग्रामसभा ठराव क्र. ३० दि. २६/०१/२०२३ ने सदर टाकी ३५ वर्षापुर्वी बांधली असून ती जुनी झाली असलेने व त्याची भरपूर पडझड झालेली असलेने टाकीचे बांधकाम, कॉलम खराब होउन आतल्या सळया दिसत असलेने निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं ६२ दि. ०८/०३/२०२३ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट GPKP/AMD/२०२२/३५९४ दि.१६/११/२०२२ ने सादर केलेला आहे. कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र.कोजिप/ग्रापापु/कावि-७/७३८/२०२३ दि.३०/०५/२०२३ ने ग्रामपंचायत कंदलगाव येथील आर.सी.सी. उंच पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत शिफारस पत्र दिलेले आहे.

तसेच सदरच्या पाण्याच्या टाकीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे कंदलगाव, ता. करवीर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास येत्या जिल्हा परिषद सर्वसाधरण सभेमध्ये मंजूरी घेणेकामी स्थायी समिती मार्फत शिफारस करणेत येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१५ :-** ग्रामपंचायत कासारवाडी ता.हातकणंगले येथील उंच पाणी साठवण टाकी निर्लेखनाबाबत **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** ग्रामपंचायत कासारवाडी ता.हातकणंगले येथील उंच पाणी साठवण टाकी निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व कार्यकारी अभियंता (ग्रापापू) जि प कोल्हापूर यांचेकडून शिफारस पत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २२१** **दिनांक २०-०६-२०२३**

ग्रामपंचायत कासारवाडी ता. हातकणंगले येथील उंच पाणी साठवण टाकी निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच/ ग्रामसेवक ग्रामपंचायत कासारवाडी यांचेकडून दि ०३/१२/२०१९ रोजी पंचायत समिती, हातकणंगले यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर पाण्याचा टाकीचा असेसमेंट उतारा व नमुना नंबर २२ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत कासारवाडी ता. हातकणंगले यांनी मासिक सभा ठराव क्रं ७० दि. १९/११/२०१९ व ग्रामसभा ठराव क्र ५२/१ दि. ०५/०२/२०२० सदर टाकी १९७८/८० मध्ये बांधली असून जीर्ण व धोकादायक झाली असल्याने काही भाग मोडकळीस आला असलेने निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं ३८२ दि. १७/०२/२०२१ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट No.DOT/Consultancy & Testing Cell/ दि.०९/१२/२०१९ ने सादर केलेला आहे. कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र.कोजिप/ग्रापापु/कावि-६/८४९/२०२२ दि. २९/०६/२०२२ ने ग्रामपंचायत कासारवाडी येथील पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत शिफारस पत्र दिलेले आहे.

तसेच सदरच्या पाण्याच्या टाकीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे कासारवाडी ता. हातकणंगले विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास येत्या जिल्हा परिषद सर्वसाधरण सभेमध्ये मंजूरी घेणेकामी स्थायी समिती मार्फत शिफारस करणेत येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१६ :-** ग्रामपंचायत टोप ता.हातकणंगले येथील उंच पाणी साठवण टाकी निर्लेखनाबाबत **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** ग्रामपंचायत टोप ता.हातकणंगले येथील उंच पाणी साठवण टाकी निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत तात्यासाहेब कोरे इन्स्टीटयुट, वारणानगर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व कार्यकारी अभियंता (ग्रापापु) जि प कोल्हापूर यांचेकडून शिफारस पत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २२२** **दिनांक २०-०६-२०२३**

ग्रामपंचायत टोप ता. हातकणंगले येथील उंच पाणी साठवण टाकी निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच/ ग्रामसेवक ग्रामपंचायत टोप यांचेकडून दि ०३/१२/२०१९ रोजी पंचायत समिती, हातकणंगले यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर पाण्याचा टाकीचा असेसमेंट उतारा व नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत टोप ता. हातकणंगले यांनी मासिक सभा ठराव क्रं २६ दि. १८/०६/२०१९ व ग्रामसभा ठराव क्र ०८ दि. २७/०५/२०१९ सदर टाकी १९७८/८० मध्ये बांधली असून जीर्ण व धोकादायक झाली असल्याने काही भाग मोडकळीस आला असलेने निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं ३९४ दि. १७/०३/२०२१ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. तात्यासाहेब कोरे इन्स्टीटयुट वारणानगर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट १५५०/२०१८ दि.२४/०९/२०१८ ने सादर केलेला

आहे.कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र.कोजिप/ग्रापापु/कावि-६/८४८/२०२२ दि. २९/०६/२०२२ ने ग्रामपंचायत टोप येथील पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत शिफारस पत्र दिलेले आहे.

तसेच सदरच्या पाण्याच्या टाकीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे टोप, ता. हातकणंगले विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास येत्या जिल्हा परिषद सर्वसाधरण सभेमध्ये मंजूरी घेणेकामी स्थायी समिती मार्फत शिफारस करणेत येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१७ :-** ग्रामपंचायत मौजे पाचगांव ता.करवीर येथील उंच पाणी साठवण टाकी निर्लेखनाबाबत **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** ग्रामपंचायत मौजे पाचगाव ता.करवीर येथील उंच पाणी साठवण टाकी निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शासकिय तंत्रनिकेतन, कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पू) जि.प.कोल्हापूर यांचेकडून शिफारस पत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २२३** **दिनांक २०-०६-२०२३**

ग्रामपंचायत पाचगांव ता. करवीर येथील उंच पाणी साठवण टाकी निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच/ ग्रामसेवक ग्रामपंचायत पाचगांव यांचेकडून दि २४/०३/२०२३ रोजी पंचायत समिती, करवीर यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर पाण्याचा टाकीचा असेसमेंट उतारा व नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत पाचगांव ता. करवीर यांनी मासिक सभा ठराव क्रं ८८/४ दि. २८/०२/२०२३ व ग्रामसभा ठराव क्र.३६/१ दि. ०७/०२/२०२३ सदर टाकी ३५ वर्षापुर्वी बांधली असून ती जुनी झाली असलेने व त्याची भरपूर पडझड झालेली असलेने टाकीचे बांधकाम, कॉलम खराब होउन आतल्या सळया दिसत असलेने निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं ०४ दि. ०४/०५/२०२३ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शासकीय तंत्रनिकेतन यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट No.GPKP/AMD/२०२३/८२२ दि. ३/०३/२०२३ ने सादर केलेला आहे. कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र.कोजिप/ग्रापापु/कावि-/६०५/२०२३ दि. २२/०५/२०२३ ने ग्रामपंचायत पाचगांव येथील उंच पाणी साठवण टाकी निर्लेखन करणेबाबत शिफारस पत्र दिलेले आहे.

तसेच सदरच्या पाण्याच्या टाकीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे पाचगांव, ता. करवीर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास येत्या जिल्हा परिषद सर्वसाधरण सभेमध्ये मंजूरी घेणेकामी स्थायी समिती मार्फत शिफारस करणेत येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१८ :-** ग्रामपंचायत मौजे खुपीरे ता.करवीर येथील जुनी पाण्याची टाकी निर्लेखनाबाबत **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** ग्रामपंचायत मौजे खुपीरे ता.करवीर येथील जुनी पाण्याची टाकी निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पू) जि.प.कोल्हापूर यांचेकडून शिफारस पत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २२४** **दिनांक २०-०६-२०२३**

ग्रामपंचायत खुपीरे ता. करवीर येथील जुनी पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच/ ग्रामसेवक ग्रामपंचायत खुपीरे यांचेकडून दि २७/०३/२०२३ रोजी पंचायत समिती, करवीर यांचेकडे प्राप्त झ ालेला आहे.

सदर पाण्याच्या टाकीचा असेसमेंट उतारा व नमुना नंबर २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत खुपीरे ता. करवीर यांनी मासिक सभा ठराव क्रं ८९/१ दि.२३/०१/२०२२ व ग्रामसभा ठराव क्र.४६/८ दि. २६/०१/२०२२ ने सदर टाकी सन १९८० मध्ये बांधली असून ती जुनी झाली असलेने व त्याची भरपूर पडझड झालेली असलेने टाकीचे बांधकाम, कॉलम खराब होउन आतल्या सळया दिसत असलेने निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं ६० दि. ०८/०३/२०२३ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट No.DOT/Consulancy&Testing Cell/ दि.१७/०२/२०२२ ने सादर केलेला आहे. कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र.कोजिप/ग्रापापु/कावि-७/६१२/२०२१ दि. २४/०४/२०२३ ने ग्रामपंचायत खुपीरे येथील जुनी पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत शिफारस पत्र दिलेले आहे.

तसेच सदरच्या पाण्याच्या टाकीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे खुपीरे, ता. करवीर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास येत्या जिल्हा परिषद सर्वसाधरण सभेमध्ये मंजूरी घेणेकामी स्थायी समिती मार्फत शिफारस करणेत येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.१९ :-** ग्रामपंचायत वरणगे, ता.करवीर येथील ग्रामपंचायत कार्यालय निर्लेखन करणेबाबत **(ग्रामपंचायत)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) :-** ग्रामपंचायत वरणगे, ता.करवीर येथील ग्रामपंचायत कार्यालय निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शासकिय तंत्रनिकेतन, कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व अधिक्षक अभियंता सा बा मंडळ कोल्हापूर यांचेकडून नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २२५** **दिनांक २०-०६-२०२३**

ग्रामपंचायत वरणगे ता. करवीर येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणेबाबत प्रस्ताव सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत वरणगे यांचेकडून दि.०२/०३/२०२२ रोजी पंचायत समिती, करवीर यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा व नमुना नं २५ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत वरणगे, ता. करवीर यांनी मासिक सभा ठराव क्रं २७ दि. २५/०७/२०१९ व ग्रामसभा ठराव क्र. ०३ दि. २२/०५/२०२३ ने सदर इमारत सन १९५९ मध्ये बांधली असून सदर इमारत पुर्ण जीर्ण झाली असून वापरण्यास धोकादायक झाली असलेने निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे**.** तसेच पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं १३१ दि. ०६/०९/२०२२ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट No.GPKP/APM/२०२१/६६९ दि. २२/०२/२०२१ ने सादर केलेला आहे.

कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र. जा.क्र/बाखा/रेशा/वशि/३/२०२२ दिनांक २४/०४/२०२३ ने वरणगे येथील ग्रामपंचायत कार्यालय इमारत निर्लेखन करणेकामी अधिक्षक अभियंता सा.बा.मंडळ कोल्हापूर यांचे कडील पत्र जा.क्र.अअ(को)/रेशा/१९२२/सन २०२३ दि. १२/०४/२०२३ नाहकरत प्रमाणपत्र दिलेले आहे.

सदरच्या ग्रामपंचायत कार्यालय इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे वरणगे, ता. करवीर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२० :-** प्रज्ञाशोध परीक्षा या योजनेस बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांचे नाव देणेबाबत **(शिक्षण प्राथमिक)**

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) :-** प्रज्ञाशोध परीक्षा सन २०२३-२४ योजनेस बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांचे नाव देणेबाबत मान्याता मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** प्रज्ञाशोध परीक्षा सन २०२३-२४ या वर्षा करीता योजनेस नाव दयायचे नसून येथून पुढे जिल्हा परिषद अंतर्गत घेण्यात येणा-या सर्व प्रज्ञाशोध परीक्षेस बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांचे नाव देणते यावे. कोल्हापूर जिल्हयाचे पहिले खासदार होते. त्यांनी स्वातंत्र्य पूर्व काळात त्यांनी १५० शाळा चालविल्या होत्या, या चालवलेल्या शाळा त्यांनी नंतर शासकीय संस्थांना बहाल केल्या. त्यांचे हे कार्य पहाता येथून पुढे प्रज्ञाशोध परीक्षा या योजनेस "बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर प्रज्ञाशोध परीक्षा" असे नाव देण्यात यावे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) :-** हो सर.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २२६** **दिनांक २०-०६-२०२३**

जागर फौंडेशन कोल्हापूर यांचेकडील दिनांक १५ मे २०२३ रोजीचे पत्रानुसार शिक्षण विभागाकडील योजनेस बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांचे नाव देणे बाबत कळविले आहे. बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर, कोल्हापूर जिल्हयाचे सुपुत्र व नामांकित राजाराम महाविदयालयाचे कर्तृत्वसंपन्न विद्यार्थीप्रिय प्राचार्य होते. त्याशिवाय कोल्हापूर जिल्हयाचे ते पहिले लोकसभेचे अपक्ष खासदार ही होते. सन १९४५ मध्ये त्यांनी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून नाईट हायस्कूल, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये सुरू केली .शिक्षण तज्ञ व प्राचार्य प्र.रा.दामले हे म्हणतात की, त्यांनी सुमारे २५२ प्राथमिक शाळा व्यवस्थित चालवून त्या शासना सुपुर्द केल्या. "शिक्षणाशिवाय समाजाचा विकास नाही" या उद्देशाने संपूर्ण आयुष्य संन्यस्तवृत्तीने शिक्षणाच्या प्रचार व प्रसारासाठी स्वतःला वाहून घेतले. अडचणीत

असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी मदत केली. आपल्या पगारातून विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक व घरगुती अडचणी देखील दूर करण्यासाठी सर्वतोपरी मदत केली. अनेक विद्यार्थ्यांना घरगुती अडचणीमध्ये आर्थिक मदत केली. त्यामुळे ते विद्यार्थ्यांचे जिवलग मित्र होते. म्हणजेच आपल्या कृतीतून कॉलेजचे आदर्श प्राचार्य कसे असले पाहिजेत याचे मुर्तीमंत उदाहरण त्यांनी घालून दिले. राजाराम कॉलेजच्या प्राचार्य पदाच्या काळात म्हणेजच स्वातंत्र्यपुर्व काळात करवीर संस्थानात झालेल्या शिक्षकांच्या पगार वाढीच्या संपाचे त्यांनी यशस्वीपणे नेतृत्व करून "शिक्षकांची पगार वाढ" ही मागणी मान्य करुन घेतली. स्वातंत्र्याच्या चळवळीबरोबरच जनतेला शिक्षण देऊन सुशिक्षीत करणे हे अत्यावश्यक आहे. अन्यथा स्वातंत्र्य मिळूनही जनतेच्या आयुष्यात कोणताही फरक पडणार नाही. असे त्यांचे ठाम मत होते. सन १९६२ मध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरची स्थापना करण्यामध्ये त्यांचा मोठा सहभाग होता.

अशा या अलौकिक व्यक्तिमत्वाचा गौरव होणे आवश्यक आहे व त्यांच्या नावाने जिल्हा परिषदेकडे कार्यान्वीत असलेल्या एखाद्या शैक्षणिक योजनेस बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांचे नाव देऊन योजना कार्यान्वीत करावी अशी विनंती करण्यात आल्याने स्थायी समिती सभेत सविस्तर चर्चा करणेत आली. त्याच प्रमाणे दरवर्षी जिल्हा परिषद कोल्हापूर शिक्षण विभाग कडून इयत्ता ४थी व ७वी चा विदयार्थ्यांकरिता जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर जिल्हा परिषद स्वनिधीतून प्रज्ञाशोध परीक्षा घेतली जाते . सदर परीक्षाही मुलांच्या बौध्दीक क्षमतेस चालना देणेसाठी या परीक्षा घेणे येत असते अशा महत्वपुर्ण परीक्षेच्या नावात बदल करुन बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर प्रज्ञाशोध परीक्षा असे नाव देणेबाबत शिक्षण समिती सभा दि.२६/५/२३ ठराव क्र.८५अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच स्थायी समिती सभे मध्ये चर्चा करण्यात आली व सदर परीक्षेचे नावात बदल करून **"बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर प्रज्ञाशोध परीक्षा"** असे नाव देणेसाठी मान्यता देण्यात आली व सदरचा विषय जि.प.सर्वसाधारण सभेचे मान्यता घेणेकामी शिफारस करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२१ :-** विदया मंदिर आळवे ता.पन्हाळा या शाळेच्या सहा खोल्या निर्लेखन करणे बाबत **(शिक्षण प्राथमिक)**

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) :-** वि म आळवे, ता पन्हाळा या शाळेच्या सहा खोल्या निर्लेखन करणेबाबतचा विषय असून याबाबत अधिक्षक अभियंता सा बा मंडळ कोल्हापूर यांचेकडून शिफारस पत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २२७** **दिनांक २०-०६-२०२३**

विद्या मंदिर आळवे ता. पन्हाळा या शाळेच्या सहा खोल्या निर्लेखन करणेबाबत. प्रस्ताव संबंधित गटशिक्षणाधिकारी/उप-अभियंता (बांधकाम) ता. पन्हाळा गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर खाली नमुद केले प्रमाणे सहा खोल्या निर्लेखन करणेबाबत कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद कोल्हापूर व अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम कोल्हापूर यांनी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियन १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या

सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला असल्याने सदरच्या विषयाबाबत शिक्षण समिती ठराव क्रं.८३ दि.२६/०५/२०२३ अन्वये ०८ वर्ग खोल्या वापरात असल्याने ०८पैकी ०६ वर्ग खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरचा विषय स्थायी मार्फत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे मंजूरी करीता ठेवणेस मान्यता मिळावी. सदरच्या शाळा खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. न. | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पन्हाळा | विद्या मंदिर आळवे | ०६ | १९५७ | ६६ | लोकसहभागातून |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०६ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२२ :-** विदया मंदिर कासारवाडी ता.हातकणंगले या शाळेच्या ०३ खोल्या निर्लेखन करणे बाबत **(शिक्षण प्राथमिक)**

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) :-** वि म कासारवाडी, ता हातकणंगले या शाळेच्या तिन खोल्या निर्लेखन करणेबाबतचा विषय असून याबाबत अधिक्षक अभियंता सा बा मंडळ कोल्हापूर यांचेकडून शिफारस पत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची मान्यता मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २२८** **दिनांक २०-०६-२०२३**

विद्या मंदिर कासारवाडी ता. हातकणंगले या शाळेच्या तीन वर्ग खोल्या निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव संबंधित गटशिक्षणाधिकारी/उप-अभियंता (बांधकाम) ता. हातकणंगले गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोली विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर खोली नमुद केले प्रमाणे तीन खोल्याचे निर्लेखन करणेबाबत कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियन १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प.मालकीच्या आहेत. शासन परिपत्रक दि.९-१-१२ नुसार अधिक्षक अभियंता सा.बां.वि.यांचेकडील सदर बांधकाम भविष्यात कार्यालयीन/निवासी वापरास योग्य/अयोग्य असल्याचे स्वयंस्पष्ट अभिप्राय तसेच अस्तित्वाचे बांधकाम धोकादायक झालेले असल्यास ते पाडण्यास हरकत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेत आले आहे. तसेच दि.८-६-१२ चे पूरक परिपत्रकानुसार रु.२० लाख पर्यंतचे निर्लेखनाचे अधिकार विभाग प्रमुख यांना आहेत. विषयांकित शाळा खोल्या निर्लेखन करणेबाबत दि.२१/०६/२०२३ चे जि.प.सर्वसाधारण सभेमध्ये मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या शाळा खोल्या पुढील प्रमाणे आहेत.

| अ.न. | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हातकणंगले | विद्या मंदिर कासारवाडी | ०३ | १९६० | ६३ | जि.प. |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०६ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२३ :-** मे.श्रवण मेडीसेल्स प्रा.लि.पुणे यांची EMD रक्कम परत मिळणे बाबत **(आरोग्य)**
**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** EMD रक्कम परत मिळणे बाबतच्या विषयास मान्यता मिळणेस विनंती आहे.
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देण्यात येत आहे.
**ठराव क्रमांक - २२९** **दिनांक २०-०६-२०२३**

पुरवठादार मे.श्रवण मेडीसेल्स प्रा.लि.पुणे यांनी त्यांचा अर्ज दि.२२/०२/२०२१ अन्वये बयाना रक्कमेची (EMD) मागणी केली असून त्या संबंधीची तसेच प्रस्तुत रक्कम महसुल खाती जमा केली असले बाबत खातरजमा केली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे

| अ.क्र. | कामाचे नाव | पुरवठादार | अनामत रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | उप जिल्हा रुग्णलय कोडोली येथील नेत्रशस्त्रक्रियागृहाचे श्रेणीवर्धन व बळकटीकरण करणेकरीता यंत्रसामुग्री पुरवठा करणे | मे.श्रवण मेडीसेल्स प्रा.लि.पुणे | ५०,०००/- | |

वरील कामाची रक्कम ही तीन वर्षावरील हक्क न सांगितलेल्या प्रलंबित ठेवी या सदराखाली राहिल्याने महाराष्ट्र जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६८ मधील नियम २०९ (७) तीन नुसार व्यपगत ठेवी म्हणून जिल्हा परिषद खाती महसुल जमा घेतली आहे. वरील पुरवठादार यांचा या रक्कमेवर हक्क असून महाराष्ट्र जि.प. व पं.स.लेखासंहिता नियम १९६८ मधील नियम २०९ (८) नुसार स्थायी समितीच्या पूर्व मान्यतेने त्यांना रक्कम आदा करता येते. सदरचा प्रस्ताव अवलोकनी येवून संबंधीत पुरवठादारांना अनामत रक्कमा आदा करण्यास स्थायी समिती सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२४ :-** मे.अप्पासामी असोसिएटस, चेन्नई यांची EMD रक्कम परत मिळणे बाबत **(आरोग्य)**
**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** EMD रक्कम परत मिळणे बाबतच्या विषयास मान्यता मिळणेस विनंती आहे.
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देण्यात येत आहे.
**ठराव क्रमांक - २३०** **दिनांक २०-०६-२०२३**

पुरवठादार मे.अप्पासामी असोसिएटस, चेन्नई यांनी त्यांचा अर्ज दि.०८/०२/२०२१ अन्वये बयाना रक्कमेची (EMD) मागणी केली असून त्या संबंधीची तसेच प्रस्तुत रक्कम महसुल खाती जमा केली असले बाबत खातरजमा केली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे

| अ.क्र. | कामाचे नाव | पुरवठादार | अनामत रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | उप जिल्हा रुग्णलय कोडोली येथील नेत्रशस्त्रक्रियागृहाचे श्रेणीवर्धन व बळकटीकरण करणेकरीता यंत्रसामुग्री पुरवठा करणे | मे.अप्पासामी असोसिएटस, चेन्नई | ५०,०००/- | |

वरील कामाची रक्कम ही तीन वर्षावरील हक्क न सांगितलेल्या प्रलंबित ठेवी या सदराखाली राहिल्याने महाराष्ट्र जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६८ मधील नियम २०९ (७) तीन नुसार व्यपगत ठेवी म्हणून जिल्हा परिषद खाती महसुल जमा घेतली आहे. वरील पुरवठादार यांचा या रक्कमेवर हक्क असून महाराष्ट्र जि.प. व पं.स.लेखासंहिता नियम १९६८ मधील नियम २०९ (८) नुसार स्थायी समितीच्या पूर्व मान्यतेने त्यांना रक्कम आदा करता येते. सदरचा प्रस्ताव अवलोकनी येवून संबंधीत पुरवठादारांना अनामत रक्कमा आदा करण्यास स्थायी समिती सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२५ :-** शिक्षण प्राथमिक विभाग जि.प.कोल्हापूर कडील जि.प.स्वनिधी मूळ अंदाजपत्रकातील तरतूदीचे पुनर्विनियोजनास मान्यता देणेबाबत **(शिक्षण प्राथमिक)**

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) :-** जि.प.स्वनिधी मूळ अंदाजपत्रकातील तरतूदीचे पुनर्विनियोजनास मान्यता मिळावी ही विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक - २३१** **दिनांक २०-०६-२०२३**

सन २०२३-२४ मध्ये शिक्षण(प्राथमिक)विभाग,जिल्हा परिषद कोल्हापूरकडील जि.प.स्वनिधी मूळ अंदाजपत्रकात २०२२ -२३ शिक्षण या लेखाशिर्षाअंतर्गत र.रू २,५८,४७,२६६/-इतकी व २२०२-१०१-२६ १३ जंगले आश्रमाशाळा वसतीगृहे अनुदान या लेखाशिर्षाअंतर्गत र.रू १०.०० लाख तरतुद मंजूर आहे.

शिक्षण समिती दिनांक २६/०५/२०२३ इ रोजी च्या सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार ज्या योजनांसाठी वाढीव निधी आवश्यक आहे. अशा योजनांवर निधी वर्ग करणेस व अंदाजपत्रक पुनर्विनियोजनास दिनांक २६/०५/२०२३ ठराव क्र.८७ अन्वये खालीलप्रमाणे मंजुरी देण्यात आली आहे.

| अ क्र | अंदाजपत्रकीयबाब व लेखाशिर्ष | मूळ तरतुद र.रू. | वर्ग करावयाची र.रू | वर्ग केलेनंतर होणारी र.रू | ज्या योजनेवर रक्कम वर्ग करावयाची त्या योजनेचे नाव | मुळ तरतुदर.रू | वर्ग करावयाची तरतूद र.रू | वर्ग केलेनंतर होणारी तरतुद र.रू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २२०२-१०१-११ डिजीटल क्लासरूम अंतर्गत जि.प.शाळांना शैक्षणिक साहित्य पुरविणे या योजना | २,००,०००/- | १,९९,०००/- | १,०००/- | २२०२-१०१-१५ जि.प.शाळेतील विदयार्थ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम | ४,००,०००/- | १,९९,०००/- | ५,९९,०००/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २<br>A | २२०२८००<br>जि.प.कडील प्राथमिक /माध्यमिक शाळामध्ये विदयार्थी सुरक्षतेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे या योजन | ५,००,०००/- | ४९९०००/- | १,०००/- | २२०२-१०१-१४<br>अध्यक्ष चषक जि.प प्राथमिक /माध्यमिक शाळा क्रिडा स्पर्धा | ४,००,०००/- | १,९९,०००/- | ५,९९,०००/- |
| | | | | | २२०२-१०१-१३<br>प्रज्ञाशोध परीक्षा/ स्कॉलरशिप मॉडयुल तयार करून जि.प. प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांची सराव परीक्षा घेणे. | ८,००,०००/- | १,००,०००/- | ९,००,०००/- |
| B | २२०२-१०३-०१<br>जि.प.च्या माध्यमिक /उच्च माध्यमिक शाळेमधे आय.टी अभ्यासक्रम सुरू करणेसाठी आस्थापना विषयक खर्च संगणक देखाभाल दुरूस्ती ,सादिलवार | ५,००,०००/- | २,००,०००/- | ३,००,०००/- | २२०२-१०३-०४<br>जि.प.च्या माध्यमिक शाळा दुरूस्ती,देखभाल, बांधकाम सरंक्षक भिंत अन्य सुविधा आस्थापनाविषयक बाबी(सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे या योजने मधील २,००,००० व आय.टी अभ्यासक्रम सुरु करणे योजने मधील२,००,०००/- असे मिळून ४,००,०००/-सदर योजनेसाठी वर्ग करण्यात आले आहेत | १,६०,०००/- | ४,००,०००/- | ५,६०,०००/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २२०२-१०१-१६ राजर्षी शाहू महाराज जिल्हा शिष्यवृत्ती ग्रामीण भागातील प्राथमिक शिष्यवृत्ती मिळणा-या विदयार्थ्यांखेरिज गुणानुक्रमे येणा-या विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती (DBT) करणे या योजना | ४,००,०००/- | १,००,०००/- | ३,००,०००/- | २२०२-१०१-१७ डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन जिल्हा शिक्षक पुरस्कार उत्कृष्ट काम करणा-या प्राथमिक / माध्यमिक शिक्षकांना प्रोत्साहन पारितोषिके (शिक्षक दिन ) | ३,००,०००/- | १,००,०००/- | ४,००,०००/- |
| | एकूण | | ९,९८,०००/- | | | | ९,९८,०००/- | |

स्थायी समिती सभे मध्ये सदर विषयबाबत चर्चा करण्यात आली व सदर जिल्हा परिषद स्वनिधी मूळ अंदाजपत्रकातील निधीचे पुर्नविनियोजनास ही स्थायी समिती सभा मान्यता देत आहे व सदरचा विषय जि.प.सर्वसाधारण सभेचे मान्यता घेणेकामी शिफारस करत आहे .

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२६ :-** चंदगड भवन येथील नियमित देखभालीकरीता आवश्यक साहित्य खरेदी करणेसाठी आर्थिक तरतूदीबाबत **(बांधकाम)**

**कार्यकारी अभियंता (बांधकाम) :-** चंदगड भवन येथे नियमित देखभालीकरीता आवश्यक साहित्य खरेदी करणेसाठी आर्थिक तरतूद उपलब्ध होणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक - २३२** **दिनांक २०-०६-२०२३**

सदयस्थितीत कोल्हापूर जिल्हा परिषद परिसरातील उपाध्यक्ष व पदाधिकारी निवासस्थान आवारातील चंदगड भवन इमारतीचा वापर चंदगड तालुक्यातील नागरीक, पदाधिकारी तसेच शासकिय कर्मचारी/अधिकारी यांचेसह जिल्हयातील व राज्यातील नागरीक, पदाधिकारी तसेच शासकिय कर्मचारी/अधिकारी यांचेकडून नियमित केला जातो. सदर इमारतीचे आरक्षणाचे जमा होणारे शुल्क जि.प.स्वनिधी मध्ये जमा केले जाते.

सदर इमारतीच्या नियमीत वापरामुळे नियमित देखभाल व स्वच्छता व निरोगी सुविधा पुरविणे बाबत वारंवार सुचना वापरकर्ते यांचकडून होत असतो. त्यानुसार बेडशिट, चादर, गादी, उशी, प्लॉस्टिकची बादली, मग, डस्टबीन, पायपुसणी, साबण बॉक्स, टॉवेल, नॅपकीन, आरसा, हँगर, सोफा कव्हर, वॉटर प्युरिफायर तसेच बेडशिट, चादर वॉशिंग करणे इत्यादी आवश्यक बाबींची सुविधा पुरविणे आवश्यक आहे. सदर आवश्यक बाबींची सुविधा पुरविणेकामी १,५७,१६०/- रुपये इतक्या निधीची आवश्यकता आहे. सदर निधी खर्च करणेकामी स्वतंत्र लेखाशिर्ष उपलब्ध नाही. सदरच्या निधीची तरतूद लेखाशिर्ष क्रमांक २०५९-८००-०५ मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/पदाधिकारी निवासस्थान बांधणे, दुरुस्ती देखभाल इ. मधून करणे आवश्यक आहे.

तरी सदर निधीची तरतूद लेखाशिर्ष क्रमांक २०५९-८००-०५ मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/पदाधिकारी निवासस्थान बांधणे, दुरुस्ती देखभाल इ. मधून करणेस सदरच्या सभेत मान्यता देणेत येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२७ :-** विभागीय व जिल्हा स्तरीय विक्री प्रदर्शन ताराराणी महोत्सव सन २०२३-२४ साठी मंडप उभारणी व अनुषंगिक बाबींचे अंदाजपत्रकीय रक्कमेबाबतचा विषय स्थायी समिती सभेस घेणेस मान्यता मिळणेबाबत **(डीआरडीए)**

**मा.प्रकल्प संचालक (जि.ग्रा.वि.यं) :-** विभागीय व जिल्हा स्तरीय विक्री प्रदर्शन ताराराणी महोत्सव सन २०२३-२४ साठी मंडप उभारणी व अनुषंगिक बाबींचे अंदाजपत्रकीय रक्कमेस मान्यता मिळावी ही विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक - २३३** **दिनांक २०-०६-२०२३**

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, कोल्हापूर मार्फत स्वयंसहाय्यता समुहांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंचे विभागीय व जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शन ताराराणी महोत्सव सन २०२३-२४ कोल्हापूर येथे आयोजित करण्यात येणार आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना या योजनेंतर्गत स्वयंसहाय्यता समुहांतील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे विभागीय व जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन ७ दिवसासाठी आयोजित करणेत येणार आहे. ग्रामविकास विभागाकडील महाराष्ट्र शासन यांचेकडील शा.नि.क्र.प्रदर्शने २०२२/प्र.क्र.५७/योजना-१ दि.०६/०२/२०२३ शासन निर्णयानुसार विभागस्तरीय प्रदर्शनाकरीता र.रु.२५.०० लक्ष व जिल्हा स्तरीय प्रदर्शनाकरीता र.रु.१०.०० लक्ष असा एकूण ३५ लक्ष निधी सन २०२३-२४ मध्ये अर्थसंकल्पीत करणेत आलेला आहे. दिनांक १७/०२/२०२३ चे पत्रान्वये जिल्हास्तरीय प्रदर्शनाकरीता र.रु.६.०० लक्ष व विभागस्तरीय करीता र.रु.१५.०० लक्ष असे एकूण र.रु.२१.०० लक्ष निधी प्राप्त आहे व शासनाकडून येणे बाकी असणारा निधी र.रु.१४.०० लक्ष अशा एकूण र.रु.३५.०० लक्ष निधीचे प्रदर्शनासाठी अनुषंगिक बाबी तात्पुरत्या भाडे तत्वावर सेवा पुरविणेसाठी अंदाजित रक्कम रकाना क्र.३ मध्ये नमूद केलेल्या रक्कमे इतकी आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मंडप अंदाजपत्रक रक्कम | १८,४०,६१५/- |
| २ | मैदान भाडे | १,२५,०००/- |
| ३ | फ्लेक्स होर्डिंग | ५०,०००/- |
| ४ | उद्‌घाटन समारंभ, स्टेज सजावट | ४०,०००/- |
| ५ | सिक्युरिटी | ५०,०००/- |
| ६ | महिला निवास व्यवस्था | ६,४०,०००/- |
| ७ | महिलांना ने-आण करणेसाठी वाहनभाडे | ५०,०००/- |
| ८ | पाणी टँकर व्यवस्था | १,१०,०००/- |
| ९ | डिजीटल स्क्रीन | १०,०००/- |
| १० | निमंत्रण पत्रिका | ३०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ११ | मैदान साफसफाई | १०,०००/- |
| १२ | सांस्कृतीक कार्यक्रम | ३,००,०००/- |
| १३ | टॉयलेट व्यवस्था | १,५०,०००/- |
| १४ | इतर अनुषंगिक बाबी | ९४३८५/- |
| | एकूण - | ३५,००,०००/- |

तरी वरील प्रस्तावित अंदाजपत्रकीय र.रु.३५,००,०००/- (र.रु.पस्तीस लक्ष फक्त) सदर रक्कमेस ग्रामविकास विभागाकडील दि.०६/०९/२०२१ व दि.०८/१०/२०२१ चे शासन निर्णयानुसार खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२८ :-** कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील मुख्य प्रशासकीय इमारत, कागलकर हाऊस, मा.अध्यक्ष निवासस्थान, मा.उपाध्यक्ष व विषय समिती सभापती निवासस्थान, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी निवासस्थान आणि अति.मुख्य कार्यकारी अधिकारी निवासस्थान कदमवाडी येथील अधिकारी कर्मचारी निवासस्थान परिसर, चंदगड भवन या आवारातील साफसफाई करणे कामासाठी २०२३-२४ या वर्षाकरीता साफसफाई करणे या कामासाठी येणा-या खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत. **(बांधकाम)**

**कार्यकारी अभियंता (बांधकाम) :-** साफसफाई करणेसाठी सन २०२३-२४ या वर्षाकरीता येणा-या खर्चास प्रशासकिय रक्कमेस मान्यता मिळावी ही विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक - २३४** **दिनांक २०-०६-२०२३**

मुख्य प्रशासकीय इमारत, कागलकर हाऊस, मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष मा.पदाधिकारी निवासस्थान यांचे आवारातील व मा.मु.का.अ./मा.अति.मु.का.अ. निवासस्थान आवारातील साफसफाई करणे कामाचा ई-निविदा प्रसिध्दीद्वारे मक्ता अरिहंत सेल्स ॲन्ड सर्व्हिसेस कोल्हापूर, कोल्हापूर यांना जा.नं.कोजिप/साप्रवि/वशि-१२/ १७३/२०२१ दिनांक ३०-०७-२०२७ च्या आदेशान्वये देणेत आला असून कामाचा कालावधी दिनांक ०१-०८-२०२१ ते ३१-०७-२०२२ अखेर होता. त्याची मुदत संपलेली असून संबंधितांना मुदतवाढ दिलेली आहे. जिल्हा परिषदेच्या वरील ठिकाणांची साफसफाई करणेसाठी सन २०२३-२४ या वर्षासाठी एकूण १७ (सतरा) स्वच्छता कामगारांची आवश्यकता आहे. त्यानुसार सन २०२३-२४ या कालावधीचा मक्ता निश्चिती करणेकरिता मा.सहाय्यक कामगार आयुक्त, शाहूपुरी कोल्हापूर यांचे कार्यालयाकडून दिनांक ३०/०१/२०२३ चे पत्रान्वये किमान वेतन दरपत्रक प्राप्त करुन घेतलेले असून त्यामध्ये नमूद असलेल्या दराप्रमाणे एकूण १७ (सतरा) मजूर कामगार यांचे रोजंदारीपोटी र.रू.४१.४४ लक्ष अंदाजित खर्च येणार आहे. जिल्हा परिषदेच्या सन२०२३-२४ च्या मूळ अंदाजपत्रकामध्ये सदर कामाच्या लेखाशिर्षासाठी रू २८.०० लक्ष इतकी तरतूद उपलब्ध आहे. सदरचा खर्च २५१५-१०१ पंचायत राज कार्यक्रम (८) २०५३ सामान्य प्रशासन - इतर सादीलवार मधील २५१५-८००-०१- जिल्हा परिषद मुख्यालय व परिसर स्वच्छता जि प स्वनिधी खाते क्र.४ सांकेतांक क्र.१७२ या लेखाशिर्षामधून होणार आहे. सदर बाबीसाठी सन २०२३-२४ या वर्षासाठी रक्कम रु.२८.०० लक्ष इतकी तरतुद उपलब्ध असून सन २०२३-२४ करिता एकुण वार्षिक रक्कम रु.४१.४४ लाख इतका अंदाजित खर्च येणार आहे. तरी विषयामध्ये नमूद केलेप्रमाणे येणाऱ्या खर्चास ग्राम विकास विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रं.झेडपीए-२०१६/प्रक्र.५६/वित्त-९ दि.०८-१०-२०२१ अन्वये प्रदान

केलेल्या अधिकारनुसार एकूण रक्कम रुपये ४१.४४ लक्ष खर्चास स्थायी समिती सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२९ :-** जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रशासकीय इमारत, कागलकर हाऊस, मा.अध्यक्ष निवासस्थान, मा.उपाध्यक्ष व विषय समिती सभापती निवासस्थान, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी निवासस्थान आणि अति.मुख्य कार्यकारी अधिकारी निवासस्थान कदमवाडी येथील अधिकारी कर्मचारी निवासस्थान परिसर, चंदगड भवन व पार्किंग तसेच प्रशासकिय इमारत लिफ्टसाठी त्याचप्रमाणे मेन राजाराम हायस्कूल, भवानी मंडप, कोल्हापूर येथे सन २०२३-२४ या वर्षा करीता सुरक्षा रक्षक नेमणूक करणेसाठी येणा-या खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत. **(बांधकाम)**

**कार्यकारी अभियंता (बांधकाम) :-** सुरक्षा रक्षक नेमणूक करणेसाठी सन २०२३-२४ या वर्षाकरीता येणा-या खर्चास प्रशासकिय रक्कमेस मान्यता मिळावी ही विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक - २३५** **दिनांक २०-०६-२०२३**

जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रशासकीय इमारत येथे ३-सुरक्षारक्षक, मा.अध्यक्ष निवासस्थान येथे ३-सुरक्षारक्षक, मा.उपाध्यक्ष व विषय समिती सभापती निवासस्थान येथे ३-सुरक्षारक्षक, मा मुख्य कार्यकारी अधिकारी निवासस्थान येथे ३-सुरक्षारक्षक, व कदमवाडी येथील अधिकारी /कर्मचारी निवासस्थान येथे ३-सुरक्षारक्षक तसेच चंदगड भवन व कागलकर हाऊस परिसर यां ठिकाणी ३ सुरक्षा रक्षक याप्रमाणे एकुण १८ सुरक्षारक्षक अधिक ३ बदली सुरक्षारक्षक (रिलिव्हर) असे एकूण २१ सुरक्षारक्षक कार्यरत आहेत. सद्या मुख्य प्रशासकीय इमारत येथील लिप्ट करिता नविन १ सुरक्षा रक्षक नियुक्त करणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे मेन राजाराम हायस्कूल, भवानी मंडप, कोल्हापूर येथे नविन ३ व रिलीव्हर १ असे ४ याप्रमाणे एकूण ५ सुरक्षा रक्षक नियुक्त करावे लागणार असलेमुळे सन २०२३-२०२४ या वर्षासाठी एकूण २६ सुरक्षा रक्षक नियुक्त करावे लागणार आहेत.महाराष्ट्र शासन निर्णय क्र एजीए-१५०६/प्रक्र९१/काम-५ दि ८/११/२००६ अन्वये ज्या शासकीय कार्यालयांना सुरक्षारक्षकांची आवश्यकता असेल तेव्हा त्याची मागणी खाजगी अभिकरणामधून न करता शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडूनच नेमणूक करावी अन्यथा संबंधित जबाबदार अधिकारी हा दंडात्मक कारवाईस प्राप्त राहील असे निर्देश आहेत. त्यामुळे कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील सुरक्षारक्षक नेमणूक सहाय्यक कामगार आयुक्त व अध्यक्ष जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, कोल्हापूर यांचे मार्फत करणेत आली आहे. महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र पदनि २५१२/प्रक्र१५७/का१२ दि १९/३/२०१४ अन्वये ज्या शासकीय कार्यालयांना बाहय यंत्रणेमार्फत कंत्राटी सुरक्षारक्षक आवश्यक असल्यास त्यांनी प्रथम सुरक्षारक्षक मंडळाकडून पहारेकरी उपलब्ध करून देण्यास असमर्थ असलेचे लेखी नकार घेऊनच निवीदा प्रक्रीया राबवून बाहय यंत्रणेमार्फत पहारेकरी पदासाठी सेवा उपलब्ध करून घ्यावी असे निर्देश दिलेले आहेत. जिल्हा परिषद कोल्हापूरसाठी सुरक्षारक्षक पुरविणे बाबत देणेत आलेल्या मक्त्याची मुदत येत्या दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी संपली आहे.

सदरचा खर्च २५१५-८००-०२ पंचायत राज कार्यक्रम (८) २०५३ सामान्य प्रशासन -इतर सादिलवार जि.प.परिसर साठी पहारेकरी पुरविणे करिता लेबर कॉन्ट्रक्टरची (मजुर मक्तेदार)निविदा प्रक्रियेतून नेमणूक करणे व अन्य अनुषगीक खर्च जिल्हा परिषद स्वनिधी खाते क्र.४ सांकेतांक क्र १७३ या लेखाशिर्षक अंर्तगत करणेत येतो. सन २०२३-२४ या वर्षाकरिता एकुण रक्कम रु.५५.०० लाख इतका अंदाजित खर्च

येणार आहे. सदरचा खर्च जि.प. स्वनिधीमधून करणेत येणार असून या बाबीसाठी सन २०२३-२४ या आर्थीक वर्षासाठी रक्कम रु.४८.०० लाख इतकी तरतुद उपलब्ध आहे. तरी वरील विषयामध्ये नमूद केलेप्रमाणे सुरक्षा रक्षक नियुक्तीसाठी दिनांक ०१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीकरिता येणाऱ्या खर्चास ग्राम विकास विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रं.झेडपीए-२०१६/प्रक्र.५६/वित्त-९ दि.०८-१०-२०२१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारनुसार एकूण रक्कम रुपये ६४.०० लक्ष इतक्या खर्चास स्थायी समिती सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.३० :-** अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) २ दुधाळ जनावरे गट वाटप या योजनेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे. **(पशुसंवर्धन)**

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी :-** अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) २ दुधाळ जनावरे गट वाटप या योजनेस प्रशासकिय व वित्तय मान्यता मिळावी ही विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक - २३६** **दिनांक २०-०६-२०२३**

अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) सन २०२३-२०२४ साठी अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) अंतर्गत २ दुधाळ जनावरे गट वाटप या योजनेवर र. रु. ८००.०० लक्ष नियतव्यय मंजूर आहे. या योजनेअंतर्गत प्रती लाभार्थी दोन दुधाळ जनावरांपैकी गाय गटासाठी र.रु. १,१७,६३८/- व म्हैस गटासाठी १,३४,४४३/- च्या मर्यादेत ७५ टक्के अनुदान देणेत येणार आहे. सदरची योजना कृषी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभागाकडील शासन निर्णय क्र.जिवायो-२०२३/प्रक्र२१/पदुम-४ दि. २७ एप्रिल २०२३ मधील मार्गदर्शक सुचना नुसार जिल्हयामध्ये राबविणेत येणार आहे. सदर योजनेवरील मंजुर नियतव्यय र.रु.८००.०० लक्ष मधुन ५९५ लाभार्थीना तालुका निहाय अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या आधारावर त्याप्रमाणात विभागुन तालुकानिहाय लक्षांकानुसार लाभ देणेत येणार आहे. तसेच सदर योजनेवरील खर्च हा उपलब्ध तरतुदीच्या अधिन राहुन करण्यात येणार आहे.

सदर योजना राबविण्यास पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभा दि.२/५/२०२३ ठराव क्र.३ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. दुभत्या जनावरांचा गटाचा पुरवठा करणे या योजनेवरील तरतुद रु. ८००.०० लक्ष तरतुदीस शासन निर्णय क्र झेडपीए-२०१६/प्रक्र ५६/वित्त ९ मंत्रालय मुंबई ३२ दि. ०७/१०/२०१७ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे असल्याने सदरच्या विषयास स्थायी समिती मार्फत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.३१ :-** राजर्षी छत्रपती शाहू महाराज वसुंधरा ग्रामपंचायत पुरस्कार सन २०२३-२४ या योजनेच्या मान्यतेबाबत व पुरस्कार बक्षिस रक्कम व होणा-या अनुषंगिक खर्चाची तरतुद करणेबाबत. **(ग्रामपंचायत)**

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) :-** राजर्षी छत्रपती शाहू महाराज वसुंधरा ग्रामपंचायत पुरस्कार सन २०२३-२४ या योजनेच्या मान्यतेबाबत व पुरस्कार बक्षिस रक्कम व होणा-या अनुषंगिक खर्चाची तरतूद करणेबाबत मान्यता मिळावी ही विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक - २३७** **दिनांक २०-०६-२०२३**

हरित महाराष्ट्र संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यासाठी आणि त्यातून दुष्काळ, पाण्याची टंचाई आणि इतर नैसर्गिक आपत्ती वर यशस्वीपणे मात करण्यासाठी राज्यातील सध्याचे हरित क्षेत्र २० % वरुन ३३ % पर्यंत नेण्याचा शासनाने संकल्प केला आहे. त्याचाच भाग म्हणून माझी वसुंधरा अभियान सुरू करण्यात आले आहे. सदर अभियान अंतर्गत भूमी, वायू, जल, अग्नी व आकाश या पंचमहाभूते तत्वांशी निगडीत विविध उपक्रम राबवून शाश्वत विकास साध्य करण्याचे शासनाचे धोरण आहे. कोल्हापूर जिल्हयामध्ये माझी वसुंधरा अभियान ४.० हे सन २०२३-२४ या कालावधीत राबविण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने माझी वसुंधरा अभियानामध्ये उत्कृष्ठ काम करणा-या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन म्हणून जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत राजर्षी छत्रपती शाहू महाराज वसुंधरा ग्रामपंचायत पुरस्कार देण्यात येणार आहे. सदर पुरस्कार अंतर्गत १. वृक्ष लागवड, २. सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, ३. अपांरपारिक ऊर्जा वापर/ सौर ऊर्जा प्रकल्प /बॅायोगॅस/ सौरपंप, ४. रेन वॅाटर हार्वेस्टिंग/ जल प्रुदषण कमी करणे/ पाणथळ जागाचे संवर्धन ५. कृषी कचरा व्यवस्थापन/फटाकेबंदी / इलेक्ट्रीक वाहने व चार्जिंग स्टेशन इत्यादी ५ बाबीचे निकष ठेवण्यात आले आहेत. सदर निकष हे परिशिष्ट अ मध्ये १०० गुण ठेवण्यात आले आहेत. सदर निकषाच्या आधारे ग्रामपंचायतींनी केलेल्या कामकाजासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती दिनांक २६ जून २०२३ ते पुण्यतिथी दिनांक ६ मे २०२४ हा कालावधी ग्राहय धरला जाईल. सदर कालावधीमध्ये केलेल्या कामकाजाचे मुल्यमापन करण्यासाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुका स्तर समिती गठीत करण्यात आली आहे.

१.जिल्हा स्तर मुल्यमापन समिती -

| अ.न. | पद | कार्यालय नाव | समितीमधील पद |
|---|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी | जिल्हा परिषद कोल्हापूर | अध्यक्ष |
| २ | कार्यकारी अभियंता (ग्रापापू) | जिल्हा परिषद कोल्हापूर | सदस्य |
| ३ | कृषी विकास अधिकारी | जिल्हा परिषद कोल्हापूर | सदस्य |
| ४ | गट विकास अधिकारी (मनरेगा) | जिल्हा परिषद कोल्हापूर | सदस्य |
| ५ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | जिल्हा परिषद कोल्हापूर | सदस्य सचिव |

१.तालुका स्तर मुल्यमापन समिती -

| अ.न. | पद | कार्यालय नाव | समितीमधील पद |
|---|---|---|---|
| १ | गट विकास अधिकारी | पंचायत समिती | अध्यक्ष |
| २ | उप अभियंता (ग्रापापू) | पंचायत समिती | सदस्य |
| ३ | कृषी अधिकारी | पंचायत समिती | सदस्य |
| ४ | विस्तार अधिकारी (पंचायत) | पंचायत समिती | सदस्य |
| ५ | सहा. गट विकास अधिकारी | पंचायत समिती | सदस्य सचिव |

वरील प्रमाणे गठीत केलेल्या समितीमार्फत सदर अभियान अंतर्गत ग्रामपंचायतींनी दिनांक २६ जून २०२३ ते ६ मे २०२४ या कालावधीमध्ये केलेल्या कामकाजाचे मुल्यमापन गट विकास अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील निवड समितीमार्फत करुन तालुकास्तरावरील पुरस्काराची निवड करण्यात येईल. प्रत्येक तालुका स्तरावरुन प्रथम क्रमांक प्राप्त झालेल्या जिल्हयातील एकूण १२ ग्रामपंचायतीमधून जिल्हा स्तरावर प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाच्या पुरस्कारासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखालील निवड समितीमार्फत मुल्यमापन करुन निवड करण्यात येईल व निवड करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींना पुरस्कार वितरण करण्यात येईल.

पुरस्कार बक्षिस रक्कम व होणा-या अनुषंगिक खर्चाची तरतुद

| अ.न. | पुरस्कार | पुरस्कार संख्या | तरतुद रु. लक्ष |
|---|---|---|---|
| १ | जिल्हास्तर प्रथम क्रमांक | १ | ७.०० |
| २ | जिल्हास्तर व्दितीय क्रमांक | १ | ५.०० |
| ३ | जिल्हास्तर तृतीय क्रमांक | १ | ३.०० |
| ४ | तालुकास्तर प्रथम क्रमांक (प्रत्येक तालुक्यासाठी २.०० प्रमाणे) | १२ | २४.०० |
| ५ | पुरस्कार वितरण समारंभ अनुषंगिक खर्च | - | ६.०० |
| | एकूण | १५ | ४५.०० |

सदरची राजर्षी छत्रपती शाहू महाराज वसुंधरा ग्रामपंचायत पुरस्कार सन २०२३-२४ ही योजना राबविणेस, योजनेसाठी ठेवण्यात आलेले निकष, निकषाचे परिशिष्ट अ मधील १०० गुण, मुल्यमापनासाठी गठीत केलेली समिती तसेच ग्रामपंचातींना दयावयाचे पुरस्कार बक्षिस रक्कम व पुरस्कार वितरण समारंभाच्या होणा-या अनुषंगिक खर्चाची तरतुद जिल्हा स्वनिधीमधून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये वरील तक्त्यामधील नमुद केलेनूसार करण्यात येवून, ती खर्च करणेस स्थायी समिती सभा मान्यता देणेत येत असून अंतिम मान्यतेसाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.३२ :-** सन २०२३-२४ मध्ये समाजकल्याण विभागाकडील २०% राखीव निधीतून घेण्यात आलेल्या योजनांना प्रशासकिय व तांत्रिक मान्यता देणेबाबत. **(समाजकल्याण)**

**जिल्हा समजाकल्याण अधिकारी :-** २०% राखीव निधीतून घेण्यात आलेल्या योजनांना प्रशासकिय व तांत्रिक मान्यात देणेबाबतच्या विषयास मान्यता देण्यास विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक - २३८** **दिनांक २०-०६-२०२३**

जिल्हा परिषद सेस फंडातून मागासवर्गीयांकरीता २०% निधी राखीव ठेवला जातो. सदर निधीअंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मूळ अंदाजपत्रकाद्वारे एकूण रक्कम रुपये ५,३९,६२,०००/- इतकी तरतूद करण्यात आली आहे. उपलब्ध तरतूदीमधून विविध सामुहिक व वैयक्तिक स्वरुपाच्या योजना घेण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन विविध योजनेसाठी खालीलप्रमाण रकाना क्रमांक मध्ये दर्शविलेप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे. खालील तक्त्यात नमूद सामुहिक स्वरुपाच्या योजनेअंतर्गत साहित्य पुरवठा

करणेकामी तांत्रिक समितीची बैठक घेवून साहित्याचे विनिर्देश निश्चित करुन त्यास  सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेवून योजना राबविणेबाबत समाजकल्याण समिती सभा दिनं ाक १२/०५/२०२३ मध्ये चर्चा होवून त्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनेअंतर्गत लाभार्थीने खरेदी करावयाच्या साहित्याचे स्पेसिफिकेशन्स व साहित्याचे अनुदान खरेदी समिती सभेमध्ये निश्चित करुन घेणेबाबत निश्चित करण्यात आलेले आहे.

शासन निर्णय दिनांक ७ ऑक्टोबर २०१७ नुसार रक्कम रुपये ५०,००,०००/- (रुपये पन्नास लाख फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थायी समिती सभेस आहेत. तसेच ५०,००,००१/- च्या वरील योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता  देण्याचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस आहेत.  त्यामुळे सदर योजनांना सक्षम प्राधिकरणाची मान्यता मिळणेकामी विषय स्थायी समिती व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये सादर करणेस समाजकल्याण समिती सभेमध्ये शिफारस करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन खालील तक्त्यात नमूद योजनेस स्थायी समिती सभेमध्ये प्रशासकीय मान्यता मिळावी ही विनंती.

| अ.क्र. | योजनेचे नाव | तरतूद रक्कम रु | प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | मागासवर्गीयांना शेती उपयोगी साहित्य पुरविणे अंतर्गत कडबाकुटी मशिन करीता अनुदान पुरविणे | ३०,०१,०००/- | ३०,०१,०००/- |
| २ | मागासवर्गीय महिला बचत गटांना आधुनिक यंत्रसामग्री पुरविणे अंतर्गत बचत गटांना (बहुपिक मळणी यंत्र, डिझेल इंजिन, बॅटरी ऑपरेटेड स्प्रे पंप, शेंगा फोडण्याचे मशिन) | १,००,००,०००/- | ५०,००,०००/- |

तसेच रक्कम रुपये ५०,००,००१/-  च्या वरील रक्कमेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | तरतूद रक्कम रु | पुनर्विनियोजनाद्वारे प्राप्त तरतूद | एकूण प्रशासकीय व तांत्रिक मान्यता रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | मागासवर्गीय वस्तीमध्ये रस्त्यावरील पोलसह एलईडी पुरविणे | २८,५०,०००/- | १,७१,५०,०००/- | २,००,००,०००/- |
| २ | मागासवर्गीय वस्तीमध्ये व्यायामाचे साहित्य पुरविणे | ६०,००,०००/- | ०० | ६०,००,०००/- |

वरीलप्रमाणे नमूद योजनांवरील खर्चास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळणेकामी सदरचा विषय येत्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये सादर करणेस स्थायी समिती सभेमध्ये शिफारस करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.३३ :-** मौजे सांबरे ता.गडहिंग्लज येथे नवीन प्रा.आ.केंद्र इमारत बांधकाम करणे अंदाजपत्रकास रक्कम रुपये ६,९९,९९,९९९/- इतक्या रक्कमेस प्रशासकिय मान्यता देणेबाबत. **(आरोग्य)**

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** मौजे सांबरे ता.गडहिंग्लज येथे नवीन प्रा.आ.केंद्र इमारत बांधकाम करणे अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देणेबाबतच्या विषयास शिफारस मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक - २३९** **दिनांक २०-०६-२०२३**

आरोग्य विभागाअंतर्गत मौजे सांबरे ता.गडहिंग्लज येथे प्राथमिक आरोग्य केंद्र शासन निर्णय क्रमांक २०१२/प्र.क्र.१४१/आरोग्य-३ मुंबई दिनांक १७ जानेवारी २०१३ अन्वये सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित राज्यात आरोग्य संस्था स्थापनेचा बृहत आराखडा मध्ये मंजूर झालेले आहे.

मागणी क्रमांक आर १ लेखाशिर्ष २२१०-३०६५ अंतर्गत अनुशेषांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र बांधकामासाठी सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षासाठी निधी महाराष्ट्र शासन सार्वजनीक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२१ प्र.क्र.१९४/आरोग्य - ३ दिनांक २ मार्च २०२३ मध्ये रु.५०.०० लक्ष निधी अनुशेषाअंतर्गत प्राप्त झालेला असून त्यानुसार कार्यकारी अभियंता बांधकाम जि.प.कोल्हापूर यांचेकडून रु.६,९९,९९,९९९/- अंदाजपत्रक प्राप्त झालेले आहे. तरी मौजे सांबरे ता.गडहिंग्लज जि.कोल्हापूर येथे नवीन प्रा आ केंद्र इमारत बांधकाम व अनुशांगिक कामे करणे. कामास रक्कम रुपये ६,९९,९९,९९९/- लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकिय मान्यता देणे आवश्यक आहे.

| अ.नं. | प्राथमिक आरोग्य केंद्राचे / उपकेंद्राचे नाव | प्रशासकिय मान्यता रक्कम (लाखात) | सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता वितरीत निधी (लाखात) |
|---|---|---|---|
| १ | मौ.सांबरे ता.गडहिंग्लज जि. कोल्हापूर येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत बांधकाम व अनुशांगिक कामे करणे | ७००.०० | ५०.०० |

तरी मौ.सांबरे ता.गडहिंग्लज जि.कोल्हापूर येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत बांधकाम व अनुशांगिक कामे करणे, कामासाठी प्रचलित दरसुचीनुसार येणा-या खर्चास मान्यता व अंदाजपत्रकिय रक्कम रुपये ६,९९,९९,९९९/- इतक्या रक्कमेस प्रशासकिय मान्यता देणेकामी आरोग्य समिती सभेच्या मान्यता घेणेत आली असून, येत्या जिल्हा परिषद सर्वसाधरण सभेमध्ये मंजूरी घेणेकामी स्थायी समिती मार्फत शिफारस करणेत येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** आणखीन कोणत्या विभागाकडील विषय असलेस घ्यावेत विषय नसलेस सभा थांबवूया.

**सचिवः-** मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक सो॰ यांचे परवानगीने सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपन्न झाली.

**कार्यवृत्तांत वाचला आणि कायम केला.**

(मनीषा ए देसाई)
सचिव तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, कोल्हापूर

(संजयसिंह चव्हाण)
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद,कोल्हापूर